



विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत


**सुविचार**

भगवान का बच्चा होने का अर्थ है – उनकी विशेषताओं को स्वयं में प्रत्यक्ष करना

(ब्रह्मकुमारीज)


✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १४ एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१४७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# बाबासाहेब आंबेडकर स्वत: आले तरी संविधान बदलले जाणार नाही



बाडमेर : भाजप तिस-यांदा देशात सत्तेत आल्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान ते बदलून टाकतील असा दावा काँग्रेस आणि विरोधकांकडून केला जात आहे. भाजपच्या खासदाराचे विधानच त्यासाठी पुरावा म्हणून दिले जात आहे. त्यामुळे भाजपची चांगलीच कोंडी झाली आहे. आम्ही संविधान बदलणार नसल्याचे भाजप नेत्यांकडून वारंवार सांगितले जात आहे. आज खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच राजस्थानच्या बाडमेर येथील रॅलीतून यावर भाष्य केले आहे. स्वत: बाबासाहेब आंबेडकर आले तरी संविधान बदलले जाणार नाही असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट सांगितले आहे. मोदींनी थेट काँग्रेसला उत्तर देत संविधान बदलण्याच्या चर्चांनाच पूर्णविराम दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणूक रॅलीला संबोधित करताना विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. तसेच बाबासाहेबांनी बनवलेले संविधान हे नुसते संविधान नाही तर आपल्यासाठी संविधान म्हणजे कुरान, बायबल आणि गीता आहे असे मोदी म्हणाले. संविधानावर वारंवार चर्चा होते. मोदींचे शब्द लिहून ठेवा, बाबासाहेब आंबेडकर स्वत: आले तरी संविधाना बदलले जाणार नाही असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. आपले संविधान सरकारसाठी गीता आहे, रामायण आहे, महाभारत आहे, कुरान आहे, बायबल आहे. हे सर्व काही आमच्यासाठी आपले संविधान आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

थापेबाजीपासून सावध राहा

एससी, एसटी, ओबीसी बंधू भगिनीशी अनेक दशकांपासून भेदभाव करणारी काँग्रेस सध्या जुनी रेकॉर्ड वाजवत आहे. जेव्हा जेव्हा निवडणुका येतात तेव्हा तेव्हा संविधानाच्या नावाने इंडिया **(पान ७ वर)**

## तिहारमध्ये केजरीवालांना पत्नीसोबत चर्चा करू दिली नाही

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना तिहार तुरुंग प्रशासन अमानवी वागणूक देत असल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी केला. त्यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेत सुनीता केजरीवाल यांना तिहार तुरुंगात अरविंद केजरीवाल यांच्याशी समोरासमोर भेटण्याची परवानगी नसल्याचे सांगितले. अधिका-यांनी त्यांना खिडकीतून केजरीवाल यांना भेटू दिले. तिहार जेल प्रशासन भाजपच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तिहार तुरुंगात आमने-सामने **(पान ७ वर)**

# जातीय जनगणना करणार, ॲप्रेन्टिसशिप कायदा आणणार



भंडारा : इंडिया आघाडीचे सरकार आल्यास जातीय जनगणना केली जाईल, असे आश्वासन राहुल गांधी यांनी भंडारा जिल्ह्यातील निवडणूक प्रचार सभेत दिले.

१० वर्षात मोदींनी उद्योगपतींसाठी सरकार चालवलं, हे मोदींचं सरकार नसून अदानींचं सरकार आहे अशा शब्दात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारा यात्रेदरम्यान आज भंडारा येथे सभेचे आयोजन करण्यात आले.

सरकारी सेवेतील ३० लाख रिक्त पदे भरण्यासाठी तसेच युवकांना प्रशिक्षणार्थी म्हणून काम मिळवून देण्याकरिता कायदा करू, असे आश्र्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले आहे.

ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी सत्तेत आल्यास तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही अनेक उपाययोजना करणार आहोत. सरकारी सेवेमध्ये ३० लाख पदे रिक्त आहेत. युवकांना या पदांवर भरती करून घेण्याची मोहीम राबविण्यात येईल. सर्व पदवीधर, डिप्लोमाधारकांना रोजगार **(पान ७ वर)**



**लातूरचे पालकमंत्री ना. मा गिरीश जी महाजन लातूर दौऱ्यावर असताना लातूर येथील देवघर निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता त्यांचे स्वागत करीत विविध विषयावर चर्चा केली. याप्रसंगी माजी मंत्री तथा निलंगा विधानसभेचे आमदार मा. संभाजी पाटील-निलंगेकर , खा. सुधाकर शृंगारे, माजी नगरसेवक शैलेश स्वामी, माजी नगरसेवक मठपती, माजी नगरसेवक रंदाळे, अनीलजी काळे भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.**

# काँग्रेस आमदारांना ५० कोटींची ऑफर

बंगळुरू : लोकसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मोठा दावा केला आहे. भाजपा राज्यात ऑपरेशन लोटस सक्रिय करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपाने काँग्रेस आमदारांना पक्ष बदलण्यासाठी ५० कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप सिद्धरामय्या यांनी केला.

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी संवाद साधला. यावेळी कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला तर सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारही पडेल, असा आरोप भाजपाकडून करण्यात येत आहे. याबाबत सिद्धरामय्या यांना विचारण्यात आले असता ते म्हणाले, गेल्या एक वर्षापासून ते (भाजपा) आमचे सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी आमच्या आमदारांना ५० कोटींची ऑफरही दिली होती. त्यांनी प्रयत्न केले पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. सिद्धरामय्या पुढे म्हणाले हे शक्य नाही. आमचे आमदार आम्हाला सोडणार नाहीत. **(पान ७ वर)**



**लातूरचे पालकमंत्री ना. गिरीशजी महाजन लातूर दौऱ्यावर असताना लातूर येथील ना. संजय बनसोडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता त्यांचे स्वागत करीत विविध विषयावर चर्चा केली. याप्रसंगी माजी मंत्री तथा निलंगा विधानसभेचे आमदार मा. संभाजी पाटील-निलंगेकर, आ. रमेश कराड, आ. विक्रम काळे, बाबासाहेब पाटील, राजेश्वर निटूरे, ॲड. बळवंत जाधव, ॲड.व्यंकटराव बेंद्रे, प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.**



**लातूरलोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज लातूर तालुक्यातील धनेगाव येथील श्री. महादेव इंगळे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत ग्रामस्थ, काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. लातूरचे भूमिपुत्र असलेले लातूर लोकसभेचे आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना या निवडणुकीत बहुमताने विजयी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने व जोमाने प्रचार करावा. लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याने आपल्या परिसरातील प्रत्येक घरापर्यंत आणि घरातील प्रत्येक मतदारापर्यंत आपण पोहचवावे असे लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धीरज देशमुख यांनी केले.**

## शरद पवार गटात नाराजीनाट्य; शेकडो कार्यकर्त्यांनी दिला राजीनामा

रावेर : लोकसभा निवडणुका जवळ आलेल्या असताना महाविकास आघाडीचे जागावाटप झाले असले तरी शरद पवार गटाकडून अद्याप काही जागांवर उमेदवार घोषित करण्यास विलंब होत आहे. याचा ताण असतानाच आता रावेर लोकसभा मतदारसंघात शरद पवारांना मोठा धक्का बसला आहे. रावेर मतदारसंघातून भाजपकडून पुन्हा एकदा रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यानंतर तगड्या उमेदवाराच्या शोधात शरद पवार गटाने नुकतीच उद्योजक श्रीराम पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. मात्र, यामुळे पवारांचे कार्यकर्ते नाराज झाले असून शेकडोंनी राजीनामे दिले जात आहेत.

माजी आमदार संतोष चौधरी हे रावेर **(पान ७ वर)**

# महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एक मनाने, एक दिलाने, एक विचाराने जिद्दीने प्रचार कार्यात सहभागी व्हावे





लातूर दि.१३ - जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात देशाने सर्वांगीण विकासात मोठी उंची गाठली असून देशाच्या प्रगतीसाठी मतदार संघाच्या विकासासाठी पुन्हा पंतप्रधान होणे काळाची गरज आहे तेव्हा लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि मित्र पक्षातील सर्व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एक मनाने एक दिलाने आणि एक विचाराने प्रचार कार्यात सहभागी होऊन उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना अधिकाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचार नियोजन निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्र पक्षातील महायुतीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी झाली. या बैठकीस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, शिवसेनेचे युवा जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर तालुकाध्यक्ष अजित शिंदे, रेणापूर तालुकाध्यक्ष विनोद आंबेकर, शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार सुरवसे, सदाशिव गव्हाणे रिपाईचे रेणापूर तालुकाध्यक्ष धम्मानंद घोडके, लातूर तालुकाध्यक्ष विजयकुमार गायकवाड भाजपाचे रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भाऊ भिसे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी येत्या १६ एप्रिल रोजी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महायुतीचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आलेला असल्याची माहिती दिली. नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा शंभर टक्के पंतप्रधान होणार आहेत. तेव्हा आपल्या घरात लग्न असल्याने भाजपा कार्यकर्त्यांनी महायुतीतील मित्र पक्षाशी समन्वय साधून एक दिलाने एक विचाराने काम करावे असे बोलून दाखवले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून प्रत्येक गावात वाडी वस्तीत **(पान ७ वर)**



# एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत यशवंत विद्यालयाचे १२ विद्यार्थी पात्र

## वळसंगी व आंबेगाव येथे भारुड या लोकगीतातून केली मतदार जनजागृती

अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) वळसंगी व आंबेगाव येथे भारुड या लोकगीतातून केली मतदार जनजागृती करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ साठी वळसंगी व आंबेगाव या गावातून जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावेत. दि. ७ मे रोजी १००% मतदान करुन आपल्या जिल्हाचे नाव उंचवावेत असे आवाहन अहमदपूर चाकुरचे स्वीप कला पथकाद्वारे भारुड या लोकगीतातून सांगण्यात आले.तसेच स्वीप जनजागृती कार्यक्रमात पारंपरिकलोकगीत, लावणी,पोवाडा,गोंधळ व भारुड या गीतातून मतदार बांधवांना मतदान करण्याचे आवाहन कराण्यात आले.




या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलदार शिवाजी पालेपाड,चाकूर चे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती कार्यक्रम करण्यात येत असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे पथक प्रमुख महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे, बस्वेश्वर थोटे, पुरुषोत्तम काळे, श्रीमती अर्चना माने, आदिनी परिश्रम घेतले.

आंबेगाव व वळसंगीचे तलाठी अंजली महाजन, ग्रामसेवक - सचिन तावरे, पोलीस पाटील - मनिषा गुंडरे, कोतवाल - अच्युत बामणे पार्वती पाकलवाड, माजी सैनिक माधव गुंडरे, प्रतिष्ठित नागरिक नंदकुमार बोडके , ज्ञानोबा येरमे , बापूराव बोडके, पोलीस पाटील रामेश्वर जगताप, रघुनाथ सूर्यवंशी, व गावातील मतदार बंधू भगिनिनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला उपस्थितीत होते.

अहमदपूर दि.१३(कारामुंगीकर) एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत यशवंत विद्यालयाचे १२ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, माहे डिसेंबर २०२३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने आठव्या वर्गासाठी घेण्यात आलेल्या एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत यशवंत विद्यालयाच्या बारा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरून यशाची नेत्र दीपक परंपरा कायम केलेली आहे.

यात वैष्णवी फड १४६ गुण, माधुरी मुंडे १२१ गुण, सतेज हंगरगे ११८ गुण, दत्ता खांडेकर ११६ गुण, साधना बेदडे ११३ गुण, मुकुंद केंद्रे ११३ गुण, वैष्णवी नागरगोजे १०८ गुण, सुचिता जाधव १०३ गुण, आदित्य तेलंग ९८ गुण, प्राप्ती चिंचोळे ९५ गुण, बसवेश्वर होनराव ९५ गुण, संदेश बंडेवार ८१ गुण घेऊन या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेले आहेत.



या शिष्यवृत्ती परीक्षेचे वैशिष्ट्य म्हणजे आठवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण संपेपर्यंत दरमहा एक हजार रुपये असे वर्षाचे १२ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होतात.

या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख संतोष मालवदे,अनंतकुमार चोचंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या नेत्र दीपक यशाबद्दल गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षी, दलित मित्र डी. बी. लोहारी गुरुजी, सहसचिव डॉ. सुनिताताई चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक अशोक पेंदेवाड, राम तत्तापुरे कार्यालयीन अध्यक्ष सोमनाथ स्वामी यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

## डॉ. हरिवंश राय बच्चन विद्यालयांमध्ये निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

अहमदपूर दि.१३ (कारामुंगीकर) डॉ. हरिवंश राय बच्चन विद्यालयांमध्ये निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, आज शाळेमध्ये वर्ग आठवीतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप समारंभ देण्यात आला. यावेळी क्रमाला उपस्थित शाळेच्या सचिव आदरणीय प्रभाताई शाळेचे मुख्याध्यापक श्री. व्यंकटेश भदाडे सर सहशिक्षिका श्रीमती. रजनी मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत विद्येची आराध्य देवता सरस्वतीचे फोटो पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे गुलाबपुषप व पेन देऊन स्वागत करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेत प्रवेश घेतल्यापासूनचा अनुभव आपल्या प्रखर शब्दात मांडला.



या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यातून दिसून येत होता. सर्व मुलांनी व मुलींनी आपल्या भाषणातून एकच सांगितले की आज आमची अवस्था कन्या सासुरीशी जाये वाट मागे परतूनी पाहेअशीच आज झालेली आहे.

यावेळी मानसी बेद्रे, निकिता केंद्रे या विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रकट करत असताना सांगितले की या शाळेने स्पर्धा परीक्षा, सराव परीक्षा,जादा तासिका, इंग्रजी परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञान प्रदर्शन शनिवारी योगासने सूर्यनमस्कार, आशा विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटी तसेच कार्यशाळेचे आयोजन करून आमचा गुणवत्तेचा दर्जा सुधारला.पुस्तकी ज्ञानाबरोबर शिस्तीचेही धडे या शाळेने आम्हाला दिले.या शाळेचे आधारवड तथा शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय व्यंकटेश भदाडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी खूप मोठं व्हावं, अधिकारी होण्याचं स्वप्न अंगी बाळगांव, शाळेने दिलेली संस्कृतीची शिदोरी आयुष्यभर सोबत ठेवावी आणि जेव्हा तुम्ही उच्चतम पदावर जाल त्यावेळी शाळा आपला सन्मान नक्कीच करेल अशी भावना यावेळी आदरणीय साहेबांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून व्यक्त केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मुसळे एस.आर. यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी मेहनत घेतली. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## सुंदर हस्ताक्षरामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो- कवी प्रा.डॉ.सय्यद अकबर



अहमदपूर दि.१३ (कारामुंगीकर) सुंदर हस्ताक्षरामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो असे प्रतिपादन कवी प्रा.डॉ.सय्यद अकबर यांनी केले.

ते संत ज्ञानेश्वर विद्यालय अहमदपूर येथे कवी प्रा.डॉ. सय्यद अकबर यांचे सुंदर हस्ताक्षर कसे काढावे व सुंदर हस्ताक्षराचे महत्व या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापीका आशा रोडगे होत्या. सोबत मु.अ. मीनाताई तौर व प्रा. सय्यद शहारूख सर उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

आपल्या सुंदर हस्ताक्षराच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कवी प्रा.डॉ. सय्यद अकबर लाला म्हणाले, सुंदर हस्ताक्षरामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत चांगले गुण मिळतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी मदत होते. ते पुढे बोलताना म्हणाले की सुंदर हस्ताक्षर ही दैवी देणगी नसून, ती एक प्रयत्न साध्य कला आहे. सुंदर हस्ताक्षरामुळे, विद्यार्थ्यांचे जीवन पण सुंदर होते. ज्याच्या अक्षराला वरळण असते त्याच्या जीवनाला वळण लागले.अक्षर सुधारण्यासाठी मनाची एकाग्रता लागते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अक्षर सुधारण्यासाठी दोन शब्दात अंतर किती असावे,अक्षर सुंदर वळणदार काढण्यासाठी कोण कोणते प्रयत्न करावे, शब्दाला काना, मात्रा, वेलांटी कशी दयावी? याची पण माहिती सुरेख प्रत्यक्ष कृतीतून दाखवली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सतीश साबणे यांनी केले. आभार मीना तौर यांनी मानले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आर्थिक विचारवंत

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दिन दलितांचे कैवारी, उधारक, कायदे पंडित, समाज सुधारक, एक जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ म्हणून ज्या महापुरुषांचा उल्लेख केला जातो ते म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेश मधील महू येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव भिमाबाई होते. वयाच्या चौदाव्या वर्षी भिकू वलगकर यांची कन्या रमाबाई सोबत त्यांचा विवाह ४ एप्रिल १९०६ मध्ये झाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक क्रांतीसूत्र बहुआयामी व लक्षणीय स्वरूपाचे होते त्यांचे ग्रंथ कार्य व कर्तव्य यांचा आर्थिक दृष्टीने विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण विश्वाला प्रकाश देणारा व कधीही न मावळणारा सूर्य हा प्रकर्षाने जाणवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राची गाडे अभ्यासक व्यासंगी होते.

त्यावेळी त्यांनी मांडलेले विचार मूलभूत आर्थिक विचार हे आजच्या एकविसाव्याशतकातही खूप महत्त्वाचे आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोलंबिया (अमेरिका) विद्यापीठामध्ये लंडन स्कूल ऑफ कॉनॉमिक्स या शिक्षण संस्थेत अर्थशास्त्रामध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तीय व्यवस्था या विषयात पीएचडी पदवी संपादन केली. त्यांनी अर्थशास्त्रराज्यशास्त्र आणि कायदा या विषयावर सखोल संशोधन केले.त्यांनी आपल्यासमाजाला शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा. यातून समाजाला शिक्षण व सामान्याना न्याय देण्यासाठी लढण्याचा संदेश दिला. डॉ.बाबासाह ेब आंबेडकरांनी भांडवलशाही व समाजवादी व्यवस्थेचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्या दोन्हीपैकी कोणतीही अर्थव्यवस्था भारताला पोषक नाही असे बाबासाहेबांचे परखड मत होते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विषमतेला व शोषणाला खूप वाव आहे. तर समाजवादी व्यवस्थेत व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होऊन रक्तरंजित क्रांतीची शक्यता असते .म्हणून या दोन्ही मधला मार्ग काढून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकारकेला. स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांनी प्रभावित झालेले होते. म्हणून आर्थिक धोरणठरवताना डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना पंडित जवाहरलाल नेहरूंनी अधिक महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२१ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डॉक्टर ऑफ सायन्स ही अतिउच्च पदवी मिळवली ती पदवी अर्थशास्त्र या विषयातूनच घेतलेली आहे .त्या ठिकाणी आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ मध्ये The journal of indian Economic society या अंकात त्यांनी small holding in India amp; Remedies हा लेख लिहिला. आर्थिक विकासात शेतीचे महत्व सांगताना डॉ.बाबासाहेब म्हणतात शेती हे केवळपोट भरण्याचे साधन नाही तर ते राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन आहे. अशा साधनाकडे फक्त उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता ते आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन म्हणून शेतीला महत्त्व दिले पाहिजे. राष्ट्राचा सर्वांगीण विकास हा शेती क्षेत्रातूनच होतो भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणतात. पण आजही भारतीय शेती मागासच आहे म्हणून भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा मागासच आहे. भारतीय अर्थव्यवस्था मागास राहण्याचे कारण म्हणजे ग्रामीण व्यवस्थेशी निगडित जमीन कसण्याची जी पद्धती आहे ती वर्षानुवर्ष तशीच्या तशीच आहे त्यामध्ये काळानुसार बदल झालेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सहकारी शेती किंवा सामूहिक शेतीचा पुरस्कार केला. शेतीबरोबरच शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग देखील वाढवले पाहिजे तरच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडतील, आर्थिक संकटातून शेतकरी बाहेर येईल, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, औद्योगीकरणाशिवाय भारताचा विकास होणे शक्य नाही रोजगार वाढला तरच आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढते, कच्चामाल व कामगाराची उपलब्धता होते, वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होते, यातून देशाचा जलद गतीने विकास होतो. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा भारतीय चलन प्रणालीवर देखील अधिक प्रभाव पडलेला आहे. १९२३ मध्ये डॉ. बाबासाहेबांनी द प्रॉब्लेम ऑफ रुपी (रुपयाचा प्रश्न) हा ग्रंथ डॉक्टर कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला. या ग्रंथासाठी आंबेडकरांनी अफाट परिश्रम घेतले. व खरी त्यांची विद्वत्ता या ग्रंथातूनच त्यांनी प्रगट केली. ब्रिटिश वर्तमानपत्रांनी या ग्रंथाचा गौरव खालील शब्दांमध्ये केलेला होता. या विषयाचे सखोल ज्ञान आणि इकॉनॉमिक्स या विषयावर समर्थपणे लिहिलेला हा ग्रंथ आहे. स्कॉटमन यांच्या मते बाबासाहेबांचे हे पुस्तक म्हणजे परिश्रमपूर्वक केलेल्या संशोधनाचे फळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या विचारांच्या नावीन्यामुळे भारतीय अर्थशास्त्राच्या अभ्यासकाला अभ्यास करण्याची प्रेरणा मिळालेली आहे. १९४७ मध्ये हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग यामध्ये बाबासाहेबांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर महत्त्वाचे विचार मांडले. देशामध्ये आदर्श चलन पद्धती कोणती हा वाद निर्माण झाला. त्यावेळी दोन पर्याय होते ते म्हणजे एक सुवर्ण परिमाण यामध्ये सोन्याच्या नाण्याचा वापर चलन म्हणून अभिप्रेत आहे व दुसरा पर्याय सुवर्ण विनिमय परिमाण यामध्ये कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय चलन पद्धतीचा अभ्यास करणारे पहिले भारतीय अर्थतज्ञ होते. जे एम केन्स व इतर अर्थशास्त्रज्ञाने सुवर्ण विनिमय परिमाण लवचिक असल्याने व या व्यवस्थेत चलन निर्मिती हा देशातील सोन्याच्या साठ्यावर अवलंबून नसल्याने ही पद्धती भारतासाठी योग्य आहे असे सांगितले पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पद्धतीला प्रखरपणे विरोध केला. बाबासाहेबांच्या मते या व्यवस्थेत चलन निर्मिती लवचिक असल्यामुळे ती अनिर्बंध होऊ शकते. त्यातून भाव वाढ होते, पैशाचे मूल्य कमी होते. सुवर्ण परिमाण पद्धती हीच भारतासाठी योग्य आहे.यासाठी अनेक ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्णपरिमान पद्धतीत भारतात किमती कशा स्थिर होत्या उलट सुवर्ण विनिमय परिमाण स्वीकारल्यानंतर किमती कशा वाढल्या हे दाखवूनदिलेले आहे. आजच्या काळातही चलन निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. चलनवाढीचा परिणाम म्हणून भाववाढ मोठ्या प्रमाणात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार आजही उपयुक्त आहेत.



**प्रा.डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय,
अहमदपूर जिल्हा लातूर

## एन. एम. एम. एस. परीक्षेत वाघमारे प्रांजली शिष्यवृत्तीधारक



हाडोळती दि.१३(नागसेन गायकवाड) एन. एम. एम. एस. परीक्षेत वाघमारे प्रांजली शिष्यवृत्तीधारक झाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, हाडोळती तालुका अहमदपूर येथील दयानंद विद्यालयातील२०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम .एम. एस. परीक्षेत मध्ये एकूण २८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातील कुमारी वाघमारे प्रांजली रवींद्र ही विद्यार्थिनी सदरील परीक्षेत शिष्यवृत्तीधारक झाली आहे.

तसेच सारथी शिष्यवृत्तीसाठी याच शाळेतील सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेआहेत. सदरील गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष प्रा. पी. टी. पवार सर, सचिव डॉ. निलेश भैय्या पवार, कार्यकारी संचालक जोगदंड आय. एम., प्राचार्य कौडगावे जि.व्ही., पर्यवेक्षक अशोक कोटसूळवार, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**दैनिक यशवंत नियमित वाचा**

## कबीरवाणी

**झूठे सुख को सुख कहे,**
**मानत है मन मोद।**
**खलक चबैना काल का,**
**कुछ मुंह में कुछ गोद।**

**भावार्थ** : संत कबीर सांगतात की, अरे जिवा तू खोट्या सुखाला मानुन खुप प्रसन्न होतोस. तुला जे मिळालेले खोटे सुख आहे ते सुख खरे नाही ते क्षणिक आहे. या खोट्या सुखाचा तुला आभास होतो आणि तूचे मन खुश होते. ही संपुर्ण सृष्टी मृत्युसाठी त्या भोजनासारखी आहे जसे भोजनाचा काही भाग तोंडामध्ये आहे आणि काही भोजन त्याच्या ओटीमध्ये आहे. कधीना कधी ते ओटीतील भोजन ही सृष्टी खावून टाकणार आहे. याचाच अर्थ असा की खोट्या सुखाला सुख मानुन या सृष्टीवरील जीव मन प्रसन्न करत आहेत मात्र सृष्टी एके दिवशी सर्वांना संपविणार आहे.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. १४ एप्रिल २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## निवडणूक खर्च निरीक्षक डुंगडुंग शहरात दाखल

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाने ४० – उस्मानाबाद लोकसभा मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरिक्षक म्हणून नियुक्त केलेले भारतीय महसूल सेवेतील अधिकारी (आयआरएस) प्रदीप डुंगडुंग हे धाराशिव येथील शिंगोली विश्रामगृहात दाखल झाले आहेत. त्यांचा मुक्काम अजिंठा सूट येथे राहणार आहे. दि.७ मे रोजी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. या निवडणुकीची अधिसूचना दि.१२ एप्रिल रोजी प्रसिध्द झाली आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी खर्च निरिक्षक म्हणून डुमडुम यांची नियुक्ती केली आहे. निवडणूक खर्चा विषयी तक्रार असल्यास सी-व्हिजील ॲपवर नोंदवावी. तसेच निरिक्षकांच्या ७६६६४२९५३८ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.



## सिना कोळेगाव धरणात ७ टीएमसी पाणी मीच आणणार – मोटे

परंडा दि.१३ (प्रतिनिधी) – तालुक्यातील सिना कोळेगाव धरणात उजनीचे ७ टिएमसी पाणी तानाजी सावंत आणणार नसून ते पाणी मीच आणणार असल्याचा दावा माजी आमदार राहुल मोटे यांनी दि.१३ एप्रिल रोजी केला.

परंडा येथील सरगम मंगल कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना मोटे म्हणाले की, २०१९ ला विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झालो असतो. तर एकच वर्षात पाणी आणले आसते. हे पाणी आणण्यासाठी मंत्री तानाजी सावंत यांनी शेतकऱ्यांना व मतदारांना खोटे आश्वसन देवून त्यांच्याच तोंडून पाणी आणण्यासाठी ४ वेगवेगळ्या तारखा त्यांनी दिल्या. या देण्यात आलेल्या तारखांचा व्हिडिओ रेकॉर्डींग पत्रकार परिषदेत ऐकवण्यात आली. तानाजी सावंत यांनी असे म्हणाले होते की, डिसेंबर २०२० रोजी या धरणात पाणी येणार तर २०२२ डिसेंबर व २०२४ अशा चार वेगवेगळ्या तारखा मंत्री सावंत यांनी या धरणात पाणी आणण्यासाठी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मंत्री सावंत खोटे बोलून शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचे त्यांनी सांगितले. तर फेब्रुवारी २०२४ ला सावंत यांनी मिरगव्हाण येथे न येणारे पाणी दाखवण्यासाठी शेतकऱ्यांची दिशाभूल कारण्यासाठी सावंत खोटे बोलत आहेत. या धरणात पाणी मीच आणणार असा ठाम दावा त्यांनी केला. तसेच सावंत म्हणाले की, आपले दोन वर्ष वाया गेले की पाणी आणण्यासाठी मंत्रिपद कशाला लागते मी का मंत्री होतो का ? मी माझ्या मतदार संघात संपूर्ण सिंचनाचे तलावाची कामे व धरणाचे हे काम माझ्या आमदरकीच्या काळात झाले. तसेच सावंत यांचा कारखाना ही आम्ही केलेल्या धरणाच्या कामामुळेच झाला असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे पत्रकार परिषदेला येण्यापूर्वी आम्ही ११ गावांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा प्रचार करून आलो असल्याचे त्यांनी सांगितले. या धरणाची प्रशासकीय मान्यता सिना कोळेगाव प्रकल्प शासन निर्णय क्रमांक सि को प्र / १०९०/१०४/( १८६/ ९२ )जस अ दिनांक २३ / १०/ १९९२ अन्वे रुपये ७०.८८ कोटी रुपयांस मान्यता प्रदान केली आहे.

तर सुधारीत प्रशासकीय मान्यता या सुधारित अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रमांक २००८/ ७९७/ (२५६/ २००८) मो प्र दिनांक ३/६/ २०10 अन्वे रु ४५५. ८२ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड संदिप पाटील, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, जेष्ठ नेते ॲड सुभाष वेताळ, शहराध्यक्ष श्रीहरी नाईकवाडी, गणीभाई हावरे, दिव्यांग जिल्हा उपाध्यक्ष घनश्याम शिंदे, माजी नगराध्यक्ष नसीर शहा बर्फीवाले, खय्युम तुटके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक डॉ रविद्र जगताप, ॲड सुजित देवकते आदी उपस्थित होते.




## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रिक्षा रॅलीद्वारे अभिवादन



धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीमजी ऑटोरिक्षा युनियन यांच्यावतीने दि.१३ एप्रिल रोजी धाराशिव शहरातून ऑटोरिक्षा रॅली काढून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील मोठ्या प्रमाणात रिक्षा सहभागी झाले होते.

मध्यवर्ती बसस्थानकातून या रॅलीचा शुभारंभ अण्णासाहेब गायकवाड, मोन्याभाई बोकेफोडे, गोपीशेट बनसोडे, अरुण रणखांब, गौतम सोनवणे आदीसह पदाधिकारी व भीमसैनिकांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या रॅलीत निळ्या ध्वजांनी रिक्षांची सजावट करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आदी महापुरुषांचा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. ही रॅली बसस्थानक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ताजमहल टॉकीज चौक, देशपांडे स्टॅन्ड, आझाद चौक, माऊली चौक, काळा मारुती चौक, पोस्ट ऑफिस, त्रिसरण चौक, लेडीज क्लब मार्गे राजमाता जिजाऊ चौक, माणिक चौक, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मार्गे पोलिस मुख्यालय, समता नगर, महात्मा ज्योतिबा फुले चौकात आल्यानंतर फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. रॅलीच्या यशस्वितेसाठी मार्गदर्शक विजय गवळी, संतोष कांबळे, सुरेश सररवदे, अध्यक्ष सागर सिरसाठे, उपाध्यक्ष बाळू रणखांब, कोषाध्यक्ष नंदू सोनवणे, सहसचिव धर्मा दुपारगुडे, सदस्य सचिन गंगावणे, अमोल वाघमारे, आकाश गायकवाड, विकास वाघमारे, बंटी सरोदे यांनी परिश्रम घेतले.

## गोंधळी समाज युवा जिल्हाध्यक्षपदी भिसे यांची निवड

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाच्या युवा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्ती पत्रात असे नमूद केले आहे की, यापुढे गोंधळी समाजाच्या विकास कार्यासाठी व सामाजिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी राष्ट्रीय गोंधळी समाज सेवा संघाने उभारलेल्या कार्यात आपण महत्वपुर्ण आपले योगदान आवश्यक आहे. तसेच गोंधळी समाजास शासकीय सामाजिक न्याय मिळवून द्याल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

सदर आपली नियुक्ती पुढील तीन वर्षासाठी राहील. राष्ट्रीय



गोंधळी समाज सेवा संघ महाराष्ट्र च्या ध्येय धोरणानुसार या सेवा संघाच्या विस्तारासाठी व गोंधळी समाज एकसंघ बांधणीसाठी व समाजाच्या विकास कार्यासाठी आपण काम करावे असे नमूद करण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १३ तास अभ्यास करून अभिवादन

**अभ्यास उपक्रम सर्वत्र व्हावेत**

सलग १२ तास अभ्यास उपक्रमाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. एकाच ठिकाणी एकाग्रतेने केलेल्या वाचनामुळे पुढील काळातही तेवढाच अभ्यास करू शकते, याची जाणिव झाली आहे. त्यामुळे हा उपक्रम सर्वत्र आयोजित होणे गरजेचे आहे, असे मत अभ्यासिका वैष्णवी नंदकुमार गायकवाड यांनी व्यक्त केले.

धाराशिव, दि.१३ (प्रतिनिधी) – महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयांतर्गत शासकीय परिचारिका महाविद्यालयाच्या २०० विद्यार्थ्यांनी दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग १२ तास अभ्यास करून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले.

शहरातील शासकीय परिचारिका महाविद्यालयातील जीएनएम व एएनएम वर्गातील विद्यार्थिनींनी दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता भारतरत्न



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभ्यास अभिवादन उपक्रमास प्रारंभ केला. यावेळी डॉ. सचिन देशमुख, डॉ. महेश कानडे, डॉ. नितीन भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. या अभ्यास अभिवादनात विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकणारी विविध पुस्तके वाचली. यात बुध्द आणि त्यांचा धम्म, भारतीय राज्यघटना, दलितांचे प्रश्न, शुद्र पूर्वी कोण होते ? ही पुस्तके वाचण्यात आली. अभ्यासकांसाठी चहा, नाष्टा, फळे व जेवनाची सोय आयोजकांच्यावतीने करण्यात आली होती. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य माधव सरवडे, प्रा. बापूराव डोंगरे, रवींद्र सुरवसे, श्रीधर भांगे, शुभदा जकाते, अनुजा शेळकीकर, श्रध्दा वाघमारे, रेखा मुळे, सुमित्रा गोरे, समुपदेशक सिध्दार्थ जानराव आदींनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये तुळजापूर विधानसभा कार्याध्यक्षपदी हृदेश्वर सुरवसे,भूम तालुका महिला अध्यक्षपदी सरस्वती पन्हाळे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सलीम हन्नुरे, जिल्हा उपाध्यक्ष अंकुश पाटील, सामाजिक न्याय जिल्हा सरचिटणीस मिलिंद डावरे, कळंब तालुका कार्याध्यक्ष सुरेश गायकवाड, राजेश पाटील, कळंब तालुका सचिव अनिकेत गायकवाड, कळंब तालुका उपाध्यक्ष अशोक गायकवाड , गोविंद मदने, तालुका संघटक नितीन लोमटे, तालुका उपाध्यक्ष आबासाहेब अडसूळ, किसान सभा सेल कळंब तालुकाध्यक्ष मुकुंद गायकवाड, आदिवासी तालुका संघटक नितीन पवार, तालुका सचिव बबन काळे, मंगरूळ शाखाप्रमुख विलास पवार, कळंब शहर प्रमुख सौरभ काळे, सोशल मीडिया धाराशिव शहरध्यक्ष दुष्यंत बनसोडे, आदिवासी सेल भूम तालुका अध्यक्ष दत्ता काळे, कामगार आघाडी धाराशिव तालुकाध्यक्ष प्रमोद हावळे, सचिव विनोद अवतारे, तालुका सह संघटक संतोष सगर, शकील सत्तार, शेख, वाशी तालुका युवक कार्य उपाध्यक्ष हेमंत आडसूळ, युवक तालुका उपाध्यक्ष बालाजी घोळवे, उपाध्यक्षपदी सुशांत नाळपे, रंजीत जाधवर, पंकज अंकुश घोळवे, संजय सुरवसे, वाशी तालुका किसान सेल अध्यक्ष तुषार उंद्रे, सामाजिक न्याय तालुका सचिव बाबासाहेब चव्हाण, तुळजापूर तालुका कार्याध्यक्ष शामराव गायकवाड, वाशी तालुका उपाध्यक्ष




बाळासाहेब कांबळे, धाराशिव शहर सहसचिव शांती लोंढे, या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यावेळी भास्करराव खोसे, जिल्हा कार्याध्यक्ष समीयोद्दीन मशायक, भूम परंडा वाशी विधानसभा अध्यक्ष नवनाथ आप्पा जगताप, प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, तुळजापूर विधानसभा अध्यक्ष मलंग शेख, अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्ष शफी शेख, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, कळंब तालुकाध्यक्ष शिवाजीराव लकडे, भूम तालुकाध्यक्ष ॲड. रामराजे साळुंखे, परंडा तालुकाध्यक्ष अमोल काळे, धाराशिव शहराध्यक्ष सचिन तावडे, तुळजापूर शहराध्यक्ष महेश चोपदार, धाराशिव कळंब विधानसभा कार्याध्यक्ष गणेश भोसले, वाशी युवक तालुकाध्यक्ष बाळासाहेब काटवटे, धाराशिव युवक तालुकाध्यक्ष बालाजी शिंदे, महिला जिल्हाध्यक्षा सरला खोसे, माजी सैनिक सेल जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सा.न्याय जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, आदिवासी सेल जिल्हाध्यक्ष नानासाहेब पवार, किसान सेल जिल्हाध्यक्ष प्रकाश बावणे, कामगार सेल जिल्हाध्यक्ष जावेद शेख, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, जिल्हा सचिव फिरोज पठाण, वाशी आदिवासी सेल तालुकाध्यक्ष विशाल काळे, विनोद जाधव, सोहेल बागवान, रवींद्र नलावडे आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील एक तरी शेतकऱ्याचा मुलगा मोफत डॉक्टर केलेला दाखवा – खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – मागील ४० वर्षांमध्ये डॉ पद्मसिंह पाटील हे महाराष्ट्र राज्याच्या विविध महत्वाच्या खात्याचे कॅबीनेट मंत्री राहिले होते. त्यानंतर त्यांनी याच मतदार संघाचे लोकसभेत ५ वर्ष खासदार म्हणून प्रतिनिधीत्व केले आहे. एवढ्या प्रदिर्घ काळामध्ये जिल्ह्यात कोणताही विकास न करता केवळ स्वत:चा विकास केला आहे. या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री, गृहमंत्री, जलसंधारण व पाटबंधारे मंत्री आदी महत्वाच्या खात्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. १९८२ मध्ये धाराशिव जिल्ह्याच्या हक्काचे वैद्यकीय महाविद्यालय नेरुळ येथे स्थलांतरीत करण्याचे पाप केले आहे. यानंतर त्यांच्या पुत्राने उध्दव ठाकरे यांनी मंजुरी दिलेले वैद्यकीय महाविद्यालय खाजगी भागीदारी तत्वावर चालवण्यासाठीचा घाट घातला होता हे धाराशिवकर विसरलेले नाही. तसेच जिल्ह्यातील एखाद्या तरी शेतकऱ्याचा मुलगा नेरुळ येथील महाविद्यालयातील मोफत डॉक्टर केला आहे का ? हे दाखवा. ज्या शेतकऱ्यांच्या ऊस प्रती टन बिलातून कपात करुन तेरणा ट्रस्टच्या वैद्यकीय महाविद्यालयातून शेतकऱ्यांचा एकही मुलगा, मुलगी डॉक्टर झाल्याचे ऐकावयात नाही. मात्र व्यवस्थापन कोट्यातून परराज्यातील श्रीमंत लोकांकडून कोरोडो रुपयांची फीस घेवून मुले डॉक्टर होण्यासाठी प्रवेश देत आहेत. या माध्यमातून जमवलेल्या पैस्यातून आलीशान गाड्या व निवडणुक खर्च केला जात आहे. त्या विकास कामावर जसे बोलता तसे हे पाप कोणाचे आहे ? याची कबुली धाराशिवकरांसमोर द्यावी. अन्यथा मतदार तुम्हाला मत पेटीतून जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही असा इशारा त्यांनी दिला. तसेच मागील ४० वर्षात कोणताही विकास न केल्यामुळे धाराशिव जिल्हा हा देशातील आकांक्षी (दरीद्री) जिल्हयाच्या यादीत तीन क्रमांकावर राहिला याच कालावधीमध्ये पद्मसिंह पाटील हे श्रीमंत खासदाराच्या यादीमध्ये देशभरातून तिसऱ्या क्रमांकावर होते. यातच धाराशिव जिल्ह्याचा विकास का झाला नाही ? याचे उत्तर असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विकासाचे कारण देत २०१९ मध्ये शरदचंद्र पवार साहेबांची साथ सोडून भाजपात गेलेल्या आ राणाजगजितसिंह पाटील यांनी ५ वर्ष भाजपाची केंद्रात सत्ता असताना कोणता विकास केला व त्यांच्या पत्नी आर्चना पाटील या धाराशिव जिल्हयातील कोणाचा विकास करण्यासाठी राष्ट्रवादी कॉग्रेस व्हाया, भाजपा राष्ट्रवादी कॉग्रेस अजित पवार गट हा द्रवीडी प्रणायाम कोणत्या विकासाठी आहे ? अशी सडकून व जहरी टीका केली. तर यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर, तालुकप्रमुख सतिश सोमाणी, जिल्हा बँकेचे संचालक संजय देशमुख, दिपक खांडेकर विभाग प्रमुख, रवि कोरे, नंदू क्षिरसागर, राजाभाऊ भांगे, बाजीराव




गुंड, व्यंकट गुंड, काका बोचरे, बंकट गुंड, सतिश जावळे, अक्षय बोंदर, दादा गाते, विष्णू अडसुळे, संजय पवार, सुरज इंगळे, काका पिंपरे, अमोल मस्के, भारत काटे, विष्णू ढवळे, उमाकांत ढवळे, मधूकर शिंदे, सागर कोळपे, देवा ढोरमारे, दाऊद तांबोळी, मनोज गुंड, उत्तम बोचरे तर टाकळी (ढोकी) येथे नंदु क्षिरसागर, राजाभाऊ भांगे, नबी सय्यद, बालाजी ढगे, हामीद देशमुख, फुलचंद कुचेकर, महादेव जगदाळे, लखन बठनपुरे, तुकाराम ढेकरे, वैजीनाथ जगदाळे, कोंड येथे सुनिल शेटे, महादेव भोसले, वैजीनाथ शेटे, संतोष भोसले, प्रविण शिवलकर, झुंबर भोसले, कुमार परदेशी, शिवराज शेट्टी वाल्मीक जाधव बाळू भोसले आदी उपस्थित होते. पाडोळी (आ) कोंड, येवती, टाकळी (ढोकी) येथे कॉर्नर सभा पार पडल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही यशस्वीतेच्या अटी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कडवे पुरस्कर्ते होते. त्यांनी लोकशाहीसंबंधी मूलभूत विचार मांडलेले आहेत. ते लोकशाहीकडे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीचे साधन म्हणून पाहतात. त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार त्यांच्या लोकशाही संकल्पनेत व्यक्त झालेले आहे. त्यांना वंचित व शोषित, अशा शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय समाजातील ८० टक्के लोकांना हक्क मिळवून देण्यासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी लोकशाही हवी होती. त्यांना केवळ २० टक्के उच्चवर्णीयांसाठी व उच्चवर्गीयांसाठी स्वातंत्र्य व लोकशाही अभिप्रेत नव्हती. म्हणून ते लिहितात, मला शेटजी-भटजीचे राज्य नको असून ऐंशी टक्के लोकांचे राज्य हवे आहे. हे ऐंशी टक्के लोक म्हणजे स्त्रिया, इतर मागासवर्गीय, आदिवासी, भटके विमुक्त, बौद्ध, शीख, ख्रिश्चन आणि मुस्लिम समाजगट. त्यांच्या मते ऐंशी टक्के लोकांसाठीची लोकशाही ही खरी लोकशाही असते. भारतामध्ये अराजकता निर्माण होऊ नये, भारत सदेव लोकशाहीप्रधान देश राहावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी स्वतः लोकशाहीच्या संरक्षणासाठी वाटेल ती किंमत देऊन प्रयत्न केलेले आहेत. लोकशाही संवर्धनासाठी व टिकविण्यासाठी सुजान नागरिकांनी प्रयत्नशील व सावध राहिले पाहिजे, त्यांनी तळमळीने, आदर्श व वास्तव यांचा मेळ घालून दृष्टेपणाने मांडलेले लोकशाहीसंबंधीचे विचार राजकीय विचार विश्वाला दिलेली मोठी देणगी आहे.**

व्यक्तिवाद आणि सीमित शासन या वैशिष्ट्यांमुळे त्यांना लोकशाही भावली होती. त्यांनी लोकशाहीचे जोरकसपणे समर्थन केलेले आहे. लोकशाही व्यवस्थेमध्येच वंचित-शोषित स्त्री-पुरुष यांचे कल्याण होते. व्यक्तिप्रतिष्ठा व व्यक्तिस्वातंत्र्य यांचे जतन होते, सर्वांना विकासाची समान संधी व समान वागवणूक मिळते. सर्व प्रश्न चर्चा आणि संमतीने सोडविले जातात. सर्वांच्या हितसंबंधाचे संतुलन राखले जाते. वंचितांना सत्ता मिळविता येते आणि परंपरेने सत्ताधीशांना प्राप्त झालेली सत्तादेखील संपुष्टात आणता येते. ते लोकशाहीचे समर्थन करताना म्हणतात, लोकशाही शासनपद्धती व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, समर्पण व शिस्त या गुणांचा परिपोष करू शकते. उच्च प्रतीचे राष्ट्रीय चारित्र्य, सचोटी आणि धारिष्ट्य यासारख्या सद्गुणांचा विकास करते. समाजरचनेत आपल्याला मानाचे स्थान आहे, अशी जाणीव जागवून व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग लोकशाहीद्वारा खुला होतो. तसेच कार्यकारी सत्ता विधीमंडळास उत्तरदायी असते. विरोधी पक्षाच्या निर्णयप्रक्रियेतील सहभाग अबाधित व वृत्तपत्राचे स्वातंत्र्य सुरक्षित राखले जाते. निवडणुकाद्वारे शांतता मार्गाने सत्तांतर होते. त्यांच्या मते लोकशाहीमुळे वंचितांना शोषण, विषमता, दारिद्र्य, गुलामगिरी आणि अज्ञान यांमधून मुक्ती मिळू शकते. सामाजिक जीवनामध्ये शांततापूर्ण सहजीवन आणि परस्पर सहयोग निर्माण करता येतो. लोकशाहीमध्ये सामान्य लोकांच्या शहाणपणावर विश्वास असतो.

डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीचा सांगितलेला अर्थ अन्य राज्यशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्यांनी सांगितलेल्या अर्थापेक्षा वेगळा व मूलभूत स्वरूपाचा आहे. ते स्वतः म्हणतात, मी लोकशाहीची निराळ्या पद्धतीने व्याख्या केलेली आहे. मला असे वाटते तीच लोकशाहीची खरी व्याख्या होऊ शकेल. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड २०) त्यांनी वाल्टर बेगहोट आणि अब्राहम लिंकन यांच्या व्याख्यांचा उल्लेख करून स्वतःची व्याख्या सांगितलेली आहे. वाल्टर बेगहोट हे त्यांच्या जगप्रसिद्ध 'इंग्लिश संविधान' या ग्रंथामध्ये म्हणतात, लोकशाही म्हणजे चर्चेवर आधारलेले शासन संस्था Government by discussion (कित्ता, खंड २०) अब्राहम लिंकनच्या मते, लोकशाही म्हणजे लोकांचे सरकार, लोकांनी नियुक्त केलेले सरकार आणि लोकांसाठी राबणारे सरकार. (कित्ता, खंड - २०) डॉ. आंबेडकरांची व्याख्या अशी आहे, लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल आणणारी शासनपद्धती म्हणजे लोकशाही. (कित्ता, खंड २०) त्यांचा लोकशाहीचा अर्थ निश्चितपणे वेगळा व मूलगामी स्वरूपाचा आहे. लोकशाहीची खरी व उच्चतम कसोटी सांगताना ते लिहितात, ज्या शासनपद्धतीमध्ये सत्तारुढ मंडळीना सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मूलभूत बदल करता येतात आणि असे बदल ग्रहण करताना जनता रक्तलांछित हिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत नाही तेथे लोकशाही नांदते आहे असे मी म्हणेन. हीच लोकशाहीची खरी व उच्चतम कसोटी आहे.लोकशाही म्हणजे काय ? याकडे प्रश्नाकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. पहिल्या दृष्टिकोनानुसार लोकशाही हा एक शासनप्रकार आहे. जिथे शासन लोकाकडून निवडले जाते. शासन हे प्रातिनिधिक शासन असते. याचा अर्थ लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकार व वेळोवेळी निवडणुका. हा दृष्टिकोन त्यांना उथळपणाचा वाटतो. दुसऱ्या दृष्टिकोनानुसार लोकशाही ही एका शासनप्रकारापेक्षा अधिक काहीतरी आहे, ती समाजसंघटनेचा एक प्रकार आहे. डॉ. आंबेडकर या दुसऱ्या दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते होते. त्यांना वाटते लोकशाही संज्ञापित करण्याची पद्धत आहे. ते लोकशाहीचा केवळ राजकीय दृष्टिकोनातून विचार करीत नाहीत. त्यांच्यासाठी लोकशाही सहजीवन पद्धती, समाजसंघटन पद्धती व आदर्श आचरण पद्धती आहे. लोकशाही जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. समतेचे दुसरे नाव म्हणजे लोकशाही, लोकशाही भौतिक आणि नैतिक विकासाचे तंत्र आहे. लोकशाही ही समान सन्मानाची, सलोख्याची आणि सहजीवनाची संस्कृती आहे.

लोकशाही सातत्याने एक स्वरूपी राहिली नाही. तिचे स्वरूप सतत बदलत राहिलेले आहे. ते लिहितात, ग्रीक लोकांची अथेनियन लोकशाही घ्या. अथेनियन लोकशाही आणि आजची लोकशाही यात महद् अंतर आहे. अथेनियन ५० टक्के लोक गुलाम असत. फक्त ५० टक्के लोक स्वतंत्र असत. पन्नास टक्के असलेल्या गुलामांना शासन संस्थेत कोणत्याही प्रकारचे स्थान नव्हते. आज लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांना शासनप्रक्रियेत स्थान आहे. ही एकच बाब अथेनियन लोकशाही व आधुनिक लोकशाही यातील फरक दाखविण्यास पुरेशी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही एका देशात देखील लोकशाहीचे स्वरूप एकच राहिलेले नाही. १६८८ सालात झालेल्या क्रांतीच्या पूर्वीची त्या देशातील लोकशाही आणि त्यानंतरची लोकशाही यांचे स्वरूप एकच आहे असे कोणी म्हणू शकत नाही. लोकशाहीचे स्वरूप सतत बदलत आहे. लोकशाहीचे केवळ स्वरूप (Form) बदलत आले असे नाही तर लोकशाहीच्या उद्दिष्टामध्ये (Purpose) देखील कालोघात बदल झालेला आहे. इंग्लंडमध्ये प्रथम लोकशाहीचे प्रधान उद्दिष्ट राजाच्या अबाधित सत्तेवर नियंत्रण घालणे, त्याला त्याच्या विशिष्ट हक्कापासूनच्या (Prerogative rights) अंमलबजावणीपासून परावृत्त करणे हे होते. आज आधुनिक लोकशाहीचे उद्दिष्ट अनियंत्रित राजसत्तेवर नियंत्रण घालणे नसून 'लोककल्याण' साधणे हे आहे. (कित्ता, खंड २०)

त्यांचा हुकूमशाहीला सक्त विरोध होता. कारण हुकूमशाहीमध्ये व्यक्तीचे हक्क आणि स्वातंत्र्य उपडपणे पायदळी तुडविले जातात. व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे जतन होत नाही. त्यांनी लोकशाही व हुकूमशाहीतील फरक स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, हुकूमशाही म्हणजे स्वातंत्र्याचा किंवा संसदीय लोकशाहीचा अभावः अशा हुकूमशाहीच्या व्याख्या केल्या जातात. परंतु या दोन्ही व्याख्या सुस्पष्ट नाहीत. संसदीय लोकशाहीतही स्वातंत्र्य नसते. कारण कायदा म्हणजेच स्वातंत्र्याची मागणी. संसदीय लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला आपल्या स्वातंत्र्यावरील बंधनाबद्दल टीका करण्याचा अधिकार असतो. संसदीय लोकशाही अधिकार आणि कर्तव्य दोन्ही देते. कायदा पाळण्याचे कर्तव्य आणि त्यावर टीका करण्याचे स्वातंत्र्य देते. हुकूमशाहीमध्ये फक्त कायदा पाळण्याचे कर्तव्य असते. परंतु त्यावर टीका करण्याचे स्वातंत्र्य मात्र नसते. हा लोकशाही व हुकूमशाहीतील फरक आहे. त्यांचा फॅसिझमला देखील विरोध होता. कारण फॅसिझममध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांवर आघात केला जातो. तसेच लोकशाहीतील सर्व मूल्ये नाकारली जातात. अल्पसंख्यकांचे हक्क नियंत्रित केले जातात. काही प्रसंगी तर त्यांचे हक्कही नाकारले जातात. तसेच ते मार्क्सच्या सर्वंकषवादाच्या विरोधी होते. त्यांच्या मते मार्क्सवादामध्ये व्यक्तिविकासाला अवकाश नसतो. व्यक्तीवर विविध नियंत्रणे लादली जातात. तेथे व्यक्तिस्वातंत्र्याला वाव नसतो. यामुळे त्यांना वाटते लोकशाही ही शासनप्रणाली हीच उत्तम शासनप्रणाली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांना मध्यवर्ती स्थान आहे. मानवी जीवन उन्नतीसाठी व आधुनिक समाजाची निर्मिती करण्यासाठी ही मूल्ये आवश्यक आहेत. या मूल्यांना त्यांनी आदर्शतत्त्वे मानलेली आहेत. त्यांच्या ॲनिहिलेशन ऑफ कास्ट या ग्रंथात ते म्हणतात, मला विचाराल तर माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारलेला समाज असेल. (खंड १ पृष्ठ ५७) दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, माझे सामाजिक तत्त्वज्ञान हे निश्चितपणे तीन शब्दांत गुंफले जाण्याचा संभव आहे. हे तीन शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव तथापि हे माझे तत्त्वज्ञान फ्रेंच राज्यक्रांतीपासून मी उसने घेतले असे कोणी समजू नये. माझा गुरू बुद्ध यांच्या शिकवणीपासून ते काढले आहे.



(शंकरराव खरात, आंबेडकर यांची आत्मकथा पृष्ठ ३७०-७५) मानवी संबंध व मानवी व्यवहार हे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांवर आधारलेले असावेत, असा त्यांचा आग्रह होता. ही मूल्य त्याच्या लोकशाहीचे मूलाधार आहेत. त्यांच्या दृष्टीने या मूल्यांशिवाय लोकशाही यशस्वी होणे संभव नाही. म्हणून त्यांनी निःसंदिग्धपणे या मूल्यांचा पुरस्कार केला. व्यक्तीला तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. यामध्ये विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य आणि एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जीवन जगण्याच्या अधिकाराचा समावेश होतो. त्यांना स्वातंत्र्य म्हणजे जीवित वित्ताचे हक्क, ही मर्यादित कल्पना मान्य नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वतःचे सामर्थ्य वापरून ध्येयसिद्धी करण्यास वाव असणे होय. व्यक्तीला स्वातंत्र्य असावे व व्यक्तिविकास हे स्वातंत्र्याचे उद्दिष्ट असावे, असे त्यांचे मत होते. त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना नकारात्मक नव्हे तर सकारात्मक (Positive) स्वरूपाची होती. त्यांना उदारमतवादी फसवे स्वातंत्र्य मान्य नव्हते; कारण उदारमतवादामध्ये पोकळ व मिथ्या स्वातंत्र्याच्या नावाखाली विषमतेकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांच्या मते समाजामध्ये समता प्रस्थापित करणे हे लोकशाहीचे उद्दिष्ट असते. त्यांनी लोकशाही संकल्पनेमध्ये समतेला प्रथम स्थान दिलेले आहे. ते म्हणतात, 'लोकशाहीचे दुसरे नाव

म्हणजे समता होय.' समतेशिवाय विषमता संपुष्टात येत नाही. त्यांच्या मते, 'समाजात विषमता आहे म्हणून आपण विषमतेने वागू असे म्हणणे म्हणजे विषमता टिकविणे आहे.' त्यांनी समतेची चर्चा प्रामुख्याने विषमतेच्या संदर्भात केली आहे. नैतिक समाज निर्माण करण्यासाठी समता आवश्यक असते. ते म्हणतात, जर नीती पाहिजे तर समता पाहिजे. समता हे सार्वजनिक नीतीचे एक मुख्य तत्त्व आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक बाबतीत समतेचे तत्त्व लागू करणे म्हणजे समाजरचना नीतीच्या पाया करणेच होय. त्यांनी स्वातंत्र्य व समता या मूल्यांपेक्षा बंधुत्व मूल्य महत्त्वाचे मानलेले आहे. ते म्हणतात, स्वातंत्र्य नि समता याच्या विरुद्ध संरक्षण फक्त बंधुभावनेतच आहे. त्यांच्या मते, 'आपल्या भोवतालच्या माणसाबद्दल आदराची भावना म्हणजे बंधुत्व.' (खंड १ पृष्ठ ५७) आपण सर्व भारतवासीय एकाच मायची लेकरे आहोत, असा भाव निर्माण होण्यास भ्रातृभाव म्हणतात. सामाजिक ऐक्य साधणारे व समाजाची शक्ती वाढविणारे हे तत्त्व आहे. (प्रदीप गायकवाड संपादक भारताचे संविधान, २००५, पृष्ठ १९८) न्याय हक्काच्या पूर्ततेतून बंधुत्व मूर्त रूपात येऊ शकते, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या मते बंधुत्व किंवा भ्रातृभाव हे लोकशाहीचे मूळ आहे. ते म्हणतात, भ्रातृभावाशिवाय (मैत्रीभावाशिवाय) स्वातंत्र्य समतेला नष्ट करू शकेल आणि समता स्वातंत्र्याला नष्ट करू शकेल. जर लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य समतेला नष्ट करीत नसेल तर त्याचे कारण त्या दोन्हीच्या पायाभूत आधाराच्या स्वरूपात तेथे भ्रातृभाव (मैत्रीभाव) असतो. त्यामुळे भ्रातृभाव हे लोकशाहीचे मूळ आहे. (खंड ४, पृष्ठ २८३) त्यांच्या मते स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तीन मूल्ये एकमेकांवर अवलंबून आहेत. ते लिहितात, समता, स्वातंत्र्य आणि भ्रातृभाव या त्रिवेणीची फारकत करता येणार नाही. त्यांचे ऐक्य अविभाज्य आहे. यातील एक-एक तत्त्व वेगळे करून त्यांची परस्परांपासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा हेतू हाणून पाडण्यासारखे आहे. स्वातंत्र्य समतेपासून अलग करता येणार नाही. समतेची स्वातंत्र्यापासून फारकत करता येणार नाही. अगर स्वातंत्र्य, समतेला भ्रातृभावापासून दूर लोटता येत नाही. समता नसेल तर केवळ स्वातंत्र्यामुळे लोकांची मिरास बहुजन समाजावर माजल्याशिवाय राहणार नाही. समता असेल आणि स्वातंत्र्य नसेल तर व्यक्तिसाहसास संधी राहणार नाही. भ्रातृभावाचा अभाव असेल तर समता व स्वातंत्र्य नैसर्गिकपणे कार्यच करू शकणार नाही. त्यांनी बुद्धाचा स्वीकार केला कारण बौद्ध तत्त्वज्ञानामध्ये ही तीनही मूल्ये आहेत. मार्क्सवादातून केवळ समतेचा पाठपुरावा होतो. ते लिहितात, बंधुभाव आणि स्वातंत्र्याशिवाय समतेला काही मूल्य राहणार नाही. फक्त बुद्धाचा मार्ग चोखाळूनच या तिन्ही तत्त्वांचे सहअस्तित्व शक्य आहे, असे दिसते. साम्यवाद एक तत्त्व देऊ शकतो पण तिन्ही नाही. (खंड ३, पृष्ठ ४६२) थोडक्यात त्यांच्या मते समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे राज्य असा होईल. समता, स्वातंत्र्य शून्य असेल तर ती व्यक्तीच्या जीवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील. बंधुत्व नसेल तर स्वातंत्र्य व समता यांची वाढ होणार नाही. यामुळे त्यांनी लोकशाही संकल्पनेमध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाला सर्वोच्च स्थान दिलेले आहे; यास्तव ते म्हणतात, लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व होय. तसेच त्यांच्या लोकशाही संकल्पनेमध्ये प्रतिनिधित्वाचा दावा (बहिष्कृतांचे प्रतिनिधित्व प्रौढ मताधिकार, मतदार संघाची व्यवस्था) लोकांचे कल्याण, घटनात्मक नैतिकता, जबाबदार शासनपद्धती, कायद्याचे राज्य, सामाजिक न्याय आणि लोकांचे सार्वभौमत्व या तत्त्वांचाही समावेश आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
मो. ९४२२९४९९६६

त्यांनी लोकशाहीचे राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाही आणि कामगारवर्गाची लोकशाही असे चार प्रकार सांगितलेले आहेत. त्यांचा सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर अधिक भर होता. सामाजिक लोकशाही ही त्यांची नावीन्यपूर्ण संकल्पना जागतिक राजकीय विचारविश्वाला दिलेली देणगी आहे. त्यांना राजकीय लोकशाहीच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक लोकशाही स्थापन करावयाची होती. राजकीय लोकशाही, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनावे, लोकांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडविणारे महत्त्वाचे साधन बनावे, अशी त्यांची अपेक्षा होती. केवळ निवडणुकीत नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला म्हणून तेवढ्याने लोकशाही साकारणार नाही. त्यांनी लोकशाहीची अत्यंत महत्त्वाची चार तत्त्वे सांगितलेली आहेत. ही चार तत्त्वे म्हणजे लोकशाहीची प्राणसूत्रेच आहेत.

(१) व्यक्तीचे हित हेच अंतिम साध्य आहे.

(२) व्यक्तीस काही अविभाज्य व अज्ञेय हक्क आहेत व त्याची राज्यसंस्थेने हमी घेतली पाहिजे.

(३) कोणतीही बाब प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला आपल्या घटनात्मक हक्कांचा त्याग करण्यास बाध्य केले जाऊ नये.

(४) राज्यसंस्थेने कोणत्याही खाजगी व्यक्तीला शासन करण्याचे अधिकार देऊ नयेत. त्यांच्या मते, 'सामाजिक लोकशाही राजकीय लोकशाही आहे.'

ते म्हणतात, आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट होऊन चालणार नाही. राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीतही झाले पाहिजे. सामाजिक लोकशाहीचा पायाभूत आधार असल्याशिवाय राजकीय लोकशाही फार दिवस टिकाव धरू शकत नाही. (प्रदीप गायकवाड, भारताचे संविधान, पृष्ठ १९८ कित्ता)

त्यांनी राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यावर अधिक भर दिलेला आहे: कारण त्याशिवाय राजकीय लोकशाही यशस्वी होणार नाही. सामाजिक लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणतात, समता, स्वातंत्र्य व भ्रातृभाव निर्माण करणाऱ्या जीवनपद्धतीस सामाजिक लोकशाही म्हणतात. सामाजिक लोकशाही महत्त्वाची आहे; कारण यामुळे समाजातील वंचित व शोषितांना विकासाची संधी मिळते. त्यांना सुखी व समाधानी जीवन जगणे शक्य होते. तद्वतच राजकीय लोकशाही देखील सुरक्षित राहते. सामाजिक लोकशाहीसाठी सामाजिक व आर्थिक समता असणे आवश्यक आहे; परंतु भारतामध्ये या दोन्ही महत्त्वपूर्ण बाबींचा अभाव आहे. ते लिहितात, भारतीय समाजव्यवस्थेत दोन गोष्टींचा संपूर्ण अभाव आहे ही गोष्ट आपण प्रथमतःच मान्य केली पाहिजे. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे सामाजिक समता. सामाजिक दृष्टीने पाहिले तर आपल्या समाजात क्रमवार उच्चनीच विषमतेचे तत्त्व आहे. या तत्त्वाप्रमाणे काही लोक उच्च स्थानी जातात, तर काही लोक अधःपतिततेच्या गर्तेत पडतात. दुसरी गोष्ट म्हणजे आर्थिक समता. आर्थिक दृष्टीने पाहिले तर मूठभर लोक अमाप धनदौलतीत लोळत आहेत, तर अफाट जनता दारिद्र्याच्या खाईत पिचत पडली आहे. (कित्ता १९८) सामाजिक लोकशाहीसाठी, एक व्यक्ती एक मत हे तत्त्व पुरेसे नाही. सामाजिक लोकशाही यशस्वी होण्यासाठो एक व्यक्ती - एक मूल्य हे तत्त्व आवश्यक आहे. त्याचबरोबर समाजामध्ये, जाचक सामाजिक बंधनापासून मुक्तता व विशेषाधिकाराचा अभाव, या बाबींदेखील असणे आवश्यक आहे.

आर्थिक लोकशाही देखील महत्त्वाची आहे; कारण त्यामुळे वंचित व शोषितांना त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करून चांगले जीवन जगणे संभव होते. आर्थिक विषमता नसलेली व्यवस्था म्हणजे आर्थिक लोकशाही होय. आर्थिक लोकशाहीमध्ये उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी असते. समाजामध्ये शोषक व शोषित असे वर्ग राहत नाहीत. आर्थिक लोकशाहीच्या माध्यमातून आर्थिक शोषण, आर्थिक विषमता नष्ट करून शोषणमुक्त असा समताधिष्ठित समाज निर्माण करणे शक्य आहे. त्यांनी आर्थिक लोकशाहीबरोबर कामगारवर्गाची लोकशाही ही संकल्पनादेखील मांडली. ज्याच्याकडे सत्ता असते त्यांनाच स्वातंत्र्य उपभोगता येते. उच्चवर्णीय व उच्चवर्गीयांचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे खरे स्वातंत्र्य नव्हे. खरे स्वातंत्र्य तेव्हाच असेल जेव्हा सत्ता कष्टकरी, शेतकरी व मजूर यांच्या हाती येईल.त्यांच्या मते लोकशाही संकल्पना भारतासाठी नवीन नाही. येथे प्राचीन काळात लोकशाही व्यवस्था गणराज्याच्या रूपामध्ये अस्तित्वात होती. ते लिहितात, भारताला लोकशाहीची ओळख नव्हती, असे नव्हे. भारतामध्ये एकेकाळी अनेक गणराज्ये तसेच राजघराणी होती. जेथे राजे लोक राज्य करीत तेथे देखील लोकमतानुसार कारभार चाले. अगर राजाच्या अनियंत्रित सत्तेवर नियंत्रण टाकण्यात येत असे, पार्लमेंट अगर पार्लमेंटरी पद्धती भारतास माहित नव्हती, असे नव्हे. बौद्ध भिक्षुकांच्या संघाचे परिशीलन केल्यास हे स्पष्ट दिसून येते की, भारतात नुसती पार्लमेंटच होती असे नव्हे, आधुनिक पद्धतीचे पार्लमेंटरी नियमही त्यांना पूर्ण अवगत होते. पार्लमेंटात कोणी कोठे बसावे, ठराव कसे आणावे, कोरम किती असावा, पक्षप्रमुख कोणास मानावे, गुप्त मतदान कसे करावे, अविश्वासाचा ठराव कसा संमत करावा वगैरे संबंधी बौद्ध भिक्षुकांनी आपल्या संघात नियम केले होते. हे पार्लमेंटरी नियम गौतम बुद्ध फक्त भिक्षुकांच्या संघास लागू करीत होते. हे खरे असले तरी बुद्धांनी ते नियम तत्काळ चालत अलेल्या राज्यपद्धतीतून घेतले असावेत हे उघड आहे. परंतु वर्णव्यवस्थेच्या उदयानंतर ही पद्धती उद्ध्वस्त झाली. पुढे ते म्हणतात, कैक वर्षे या देशातील लोकशाहीवर माती पडली असल्या कारणाने लोकशाहीच्या ठिकाणी हुकूमशाही स्थापन होईल की काय अशी भीती वाटते. अथवा लोकशाही नावालाच राहील आणि व्यवहारात हुकूमशाहीच नांदल. यापैकी दुसरा धोका अधिक संभवनीय आहे. डॉ. आंबेडकरांनी सूचित केलेल्या धोक्याकडे आज गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. पुनः या देशात लोकशाहीला उद्ध्वस्त करणाऱ्या शक्ती व प्रवृत्ती वाढणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे.

भारतातील पारंपरिक समाजरचना लोकशाहीला पोषक नाही. ते म्हणतात, लोकशाही हे सामाजिक संघटन आहे. या देशाची पारंपरिक समाजरचना लोकशाहीला मुळीच पूरक नाही. तीतून श्रीमंत गरीब, उच्च-नीच, मालक-मजूर असे स्थायी स्वरूपाचे वर्ग समाजात निर्माण होऊन टिकून राहतात. एका अंगाने जुलूम, दंभ, गर्व व स्वार्थ वर्षावतो आणि दुसऱ्या बाजूला असुरक्षितता, दारिद्र्य, अधोगती आणि स्वातंत्र्य, आत्मनिर्भरता, स्वावलंबन, प्रतिष्ठा व स्वाभिमान यांचा ह्रास होत जातो. सामाजिक रचनेत मोलिक बदल केल्याशिवाय लोकशाहीची इमारत भरभक्कम पायावर उभा राहू शकत नाही. त्यांना वाटते ज्या समाजात भिन्न सामाजिक गटाच्या दृष्टिकोनात प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमूहाच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपुरी वा अनुपस्थित असते तेथे लोकशाही वातावरण निर्माण होणे अवघड असते. यामुळे भारतीय समाजरचनेमध्ये मूलभूत बदल करण्याची आवश्यकता आहे.

त्यांना कोणत्याही एका जातीची एकाधिकारशाही मान्य नव्हती. कारण त्यामुळे राजकीय सत्ता अस्थिर होते. म्हणून ते लिहितात, राजकीयदृष्ट्या देशाचा कारभार एका जातीच्या हाती जाणे अनिष्ट आहे. मग ती जात ब्राम्हण असो, मराठा असो किंवा मुस्लिम असो. त्यांनी २७ जानेवारी १९१९ रोजी साऊथबरो समितीसमोर केलेल्या निवेदनामध्ये एका जातीच्या एकाधिकारशाहीच्या दुष्परिणामाची नोंद केली आहे. ते म्हणतात, भारतीय लोक अनेक जातीत व संप्रदायात विभागले असल्यामुळे मतदान प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो. कोणत्याही प्रादेशिक मतदार संघात जेव्हा विविध वर्गातील लोकात निवडणूक होतात, तेव्हा मतदार हे आपल्या वर्गातील उमेदवारांनाच मतदान करतात, त्यामुळे ज्या वर्गातील मतदारांची संख्या जास्त असते त्याच वर्गातील उमदवार निवडून येतात. असे उमेदवार इतर वर्गातील लोकांचा विचार करू शकत नाहीत. त्यामुळे आज आपल्या देशात जे प्रभावी राजकीय पक्ष आहेत त्यांचे वारसदार स्वतःला या देशाचे मालक समजून इतरांना आपले गुलाम समतात. यात नमूद केलेल्या मानसिकतेत आणि वास्तवात विचारपूर्वक बदल करण्याची गरज आहे.

त्यांच्या दृष्टीने लोकशाहीसाठी समाजाची रचनादेखील लोकशाहीप्रधान असावी लागते. म्हणून ते लिहितात, एखादे शासन तोवर लोकशाहीप्रधान असू शकत नाही, जोवर ते ज्यासाठी कार्यरत आहे त्या समाजाची रचना लोकशाहीप्रधान असत नाही. जर समाजातील व्यक्ती वर्गावर्गामध्ये विभक्त असतील, तर अशा समाजातील शासन जरी लोकांचे आणि लोकाकडून चालणारे अशा प्रकारचे असले तरी ते कधीच लोकाकरिता असलेले शासन होऊ शकत नाही. ते वर्गाकडून वर्गाकरिता चालणारे शासन असेल. लोकाकरिता शासन केवळ तेथेच असेल जिथे प्रत्येक व्यक्तीची प्रवृत्ती लोकशाहीप्रधान असेल. याचा अर्थ प्रत्यक व्यक्ती इतर व्यक्तीला आपल्या समान वागवणूक द्यायला तयार असेल आणि जितके स्वातंत्र्य ती स्वतःकरिता अपेक्षित करते तितकेच स्वातंत्र्य ती इतरांना देण्यास तयार असेल ही लोकशाहीप्रधान मानसिक प्रवृत्ती लोकशाहीप्रधान शासनासाठी आवश्यक असते.

त्यांनी लोकशाहीतील दोन अत्यंत महत्त्वाच्या घटकांचा नामनिर्देश केलेला आहे. पहिली सहबांधवाबद्दल सममस्कत सन्मान आणि समभाव दुसरी इतर अशा सामाजिक रचना कांही लोकांना विशेषाधिकार असणे व काहींना नसणे यामधून समाजातील काही वर्ग एकाकी तुटून पडणे लोकशाहीशी विसंगत आहे.

डॉ. आंबेडकरांना आदर्श लोकशाही अभिप्रेत होती. त्यांनी आदर्श लोकशाहीचे निकष सांगितलेले आहेत. त्यांच्या मते, 'लोकशाही समाज हा नेहमी गतिशील असला पाहिजे. समाजामध्ये वेळोप्रसंगी होणारे बदल लोकांनी परस्परांना कळविले पाहिजेत. समाजात विविध सामाजिक संस्था व मंडळे उभी केली पाहिजे. त्यांनी परस्परांना त्यांच्या कार्यासंबंधी कळविले पाहिजे. समाज बंदिस्त असू नये. समाज खुला असावा. समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-गट व गट-गट यांमध्ये वैचारिक संवाद असावा. ज्या समाजामध्ये ही वैशिष्ट्ये असतात तेथे आदर्श लोकशाही असते.

त्यांचा व्यक्तिपूजेला विरोध होता. ज्या थोर लोकांनी राष्ट्राची सेवा केली आहे त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगण्यात काही गैर नाही; परंतु कृतज्ञतेला मर्यादा असाव्यात. आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कुठलेही राष्ट्र कृतज्ञ राहू शकत नाही. राजकारणात भक्ती वा व्यक्तिपूजा हा लोकशाहीचा नव्हे तर अधोगतीचा आणि हुकूमशाहीचा मार्ग आहे. यामुळे कितीही मोठा माणूस असला तरी त्यांच्या चरणावर लोकांनी आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेऊ नये की जेणेकरून त्याला प्राप्त अधिकाराचा तो लोकांच्या संस्था उद्ध्वस्त करण्यासाठी करील. व्यक्तिपूजा भारतीयांचे खास वैशिष्ट्य आहे. येथे व्यक्तिपूजेचा खूप दुरुपयोग झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या मनात व्यक्तिपूजेबद्दल प्रचंड चीड होती. म्हणून ते म्हणतात, मी मूर्तिपूजक नाही, उलट त्या फोडण्यावरच माझा विश्वास आहे. (रावसाहेब कसबे, आंबेडकबाद तत्त्व आणि व्यवहार, पृष्ठ क्र. १०) त्यांचा हा सल्ला भारतीयांसाठी फार महत्त्वाचा आहे; कारण विभूतीपूजा आपल्या मनात खोलवर रुजलेली आहे. यामुळे लोकशाहीला धोका उद्भवू शकतो. त्यांनी राजकीय पक्षांनादेखील महत्त्वाचा सल्ला दिलेला आहे. कोणत्याही राजकीय पक्षानी स्वतःला देशापेक्षा मोठे समजू नये. ते लिहितात, राजकीय पक्षांनी देशापेक्षा स्वतःच्या तत्त्वप्रणालीला मोठे मानू नये. आज प्रत्येक पक्ष स्वतःची तत्त्वप्रणाली देशापेक्षा मोठी मानत आहे. देशात लोकशाही आपले बाह्यरूप सांभाळेल. प्रत्यक्षात ती मात्र हुकूमशाहीला स्थान देईल. एखाद्या पक्षाला जर प्रचंड बहुमत असेल तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा धोका अधिक मोठा आहे. आज याचा आपल्याला अनुभव येत आहे.

त्यांच्या मते लोकशाही सबल होण्यासाठी समाजातील सर्व घटकांमध्ये सत्तेचे न्याय्य पद्धतीने वाटप झाले पाहिजे. सत्ता मूठभर उच्चवर्षीय व उच्चवर्गीय लोकांच्या हाती केंद्रित होता कामा नये. त्यांनी पहिल्या गोलमेज परिषदेमध्ये ब्रिटिशांना स्पष्टपणे सांगितले होते की, सत्तेत सर्वांना योग्य प्रमाणात सहभाग मिळाला पाहिजे. ते म्हणतात, जर तुम्ही सत्ता हस्तांतरित करीत असाल तर त्या हस्तांतरामध्ये अशा अटी व तरतूदी असाव्यात. जेणेकरून ती सत्ता काही विशेष अशा मूठभर लोकांच्या हातात जाणार नाही; तर सर्व जातींना योग्य प्रमाणात सहभाग मिळेल. त्यांना वाटते सत्तेचे समवितरण क्रांती रोखू शकते म्हणून ते लिहितात, जेव्हा जेव्हा समाजातील सत्ताधारी लोकांनी आपल्या हाती असलेली सत्ता यांची सत्ताहिनांबरोबर वाटणी करण्याचे नाकारले त्यावेळी क्रांती घडून आली. क्रांतीचा मार्ग रोखून धरण्याचा फक्त एकच उपाय आहे आणि तो म्हणजे समाजात सत्ता आणि अधिकार यांची योग्य प्रकारे वाटणी करणे होय.

त्यांनी लोकशाहीमध्ये मानवी हक्क संवर्धन व हक्क संरक्षण यांना मध्यवर्ती स्थान दिलेले आहे. परंतु ते हक्काबरोबर नागरिकांना त्यांच्या कर्तव्याचीही जाणीव करून देतात. ते लिहितात, आमचे हे मोठे कर्तव्य आहे की, लोकशाही व्यवस्थेला जीवनासंबंधातील प्रमुख सिद्धांताच्या स्वरूपात जगातून नष्ट होऊ देता कामा नये. जर आमचा लोकशाहीवर विश्वास आहे तर तिच्या प्रति आम्ही प्रामाणिक व निष्ठावान असले पाहिजे. आम्ही लोकशाहीवर फक्त विश्वासच न ठेवता आमच्या शत्रूला लोकशाहीचे मूल तत्त्व स्वातंत्र्य, समता व बंधुत्त्व यांना नष्ट करण्यास साह्य होईल असे कोणतेही कृत्य करू नये. लोकशाही टिकली तर तिची फळे आम्हाला कधीनाकधी चाखायला मिळणारच; पण लोकशाही संपली तर मात्र ते आपले मरणच ठरेल. यातून त्यांनी आपल्याला लोकशाहीविषयक कर्तव्याची जाणीव करून दिलेली आहे.

त्यांच्या मते लोकशाहीमध्ये हिंसेला स्थान नसते. हिंसेमुळे लोकशाही धोक्यात येते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य क्षीण होते. यामुळे त्यांनी आंदोलनाचे हिंसक मार्ग वर्ज्य ठरविले. इतकेच नव्हे तर त्यांनी कायदेभंग, असहकार व सत्याग्रह या गांधीप्रणीत लढा तंत्रांनाही अग्राह्य ठरविले. त्यांना ते अराजकतेचे व्याकरण (Grammar of narchay) असे म्हणत. आर्थिक व सामाजिक ध्येय साध्य करण्यासाठी किंवा अन्याय-अत्याचार निवारणासाठी कोणीही हिंसेचा वापर करू नये. ते म्हणतात, मला असं वाटतं आपण सर्वांनी सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संविधानात्मक पद्धतीचा वापर केला पाहिजे. हे असे करणे अत्यावश्यक आहे. याचा अर्थ असा आहे की, आपण सर्वांनी क्रांतीच्या हिंसक, रक्तपाताच्या पद्धतीचा त्याग केलाच पाहिजे. याचा अर्थ असा आहे की, आपण सर्वांनी नागरी असहकार, सविनय कायदेभंग आणि सत्याग्रहाच्या पद्धतीचा त्याग केलाच पाहिजे. घटनात्मक पद्धती खुल्या असताना ह्या अशा असंवैधानिक पद्धतीचे समर्थन होऊच शकत नाही. हिंसक पद्धती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून फक्त अराजकतेचे व्याकरण

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-प्रा.बी.व्ही.मोतीपवळे, संपादक - डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

आहे आणि म्हणून आपण त्यांचा जेवढ्या लवकर त्याग करू तेवढे ते आपल्या अधिक भल्याचे असणार आहे. याचा अर्थ त्यांना हिंसेचा मार्ग मान्य नव्हता. लोकांच्या जीवनामध्ये सामाजिक व आर्थिक बदल सनदशीर म्हणजे घटनात्मक मार्गाने करावेत असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी २२ डिसेंबर १९५२ रोजी पुणे बार असोसिएशनच्या ग्रंथालयाच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या अतिशय महत्त्वाच्या भाषणामध्ये लोकशाही यशस्वी होण्यासाठी मौलिक उपाययोजना वा अटी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या मते विषमतारहित समाज, विरोधी पक्षाचे अस्तित्व, वैधानिक व कारभारविषयक क्षेत्रामध्ये समता, संविधानात्मक नीती, अल्पसंख्याकांची सुरक्षितता आणि नीतिमान समाज आदी अटींची पूर्तता केल्यास लोकशाही यशस्वी होऊ शकते.

**विषमताविरहित समाज**

लोकशाही यशस्वी होण्यासाठी विषमताविरहित समाज असणे, ही पहिली अट आहे. ज्या समाजामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये सामाजिक व आर्थिक विषमता असते तिथे लोकशाही रुजू शकत नाही. त्यांनी १९५० मध्ये यासंदर्भात गंभीर इशारा देताना म्हटले होते, २६ जानेवारी १९५० रोजी आपण अशा विसंगतपूर्ण जीवनात प्रवेश करीत आहोत को राजकीय क्षेत्रात आपल्याला समता मिळणार आहे. परंतु सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मात्र विषमताच विषमता मिळणार आहे. राजकीय क्षेत्रात आपण एक मनुष्य-एक मत-एक मूल्य या तत्त्वाला मान्यता दिली आहे; परंतु आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मात्र आपण एक मनुष्य-एक मूल्य या तत्त्वास नकार देत आहोत. अशा विसंगतपूर्ण जीवनात आपण किती काळ जगणार? जर जास्त काळ असेच चालले तर विषमतेने ग्रासलेले लोक राजकीय लोकशाही फेकून दिल्याशिवाय राहणार नाहीत.

विषम समाजामध्ये शोषक-शोषित वर्ग निर्माण होतात. विषमता समाजातील अज्ञान, दारिद्र्य शोषण आणि दासव्य या सामाजिक रोगाची जननी असते. विषमतेमुळे सामाजिक एकोपा व ऐक्य धोक्यात येते. श्रीमंत-गरीब यांच्यामध्ये आर्थिक अंतराबरोबर सामाजिक अंतरही वाढते. विषमतेचा व्यक्तीच्या विकासावर खोल परिणाम होत असतो. समाजामध्ये सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्या ठायी झाले असा वर्ग एका बाजूला व सर्व प्रकारचे भार वाहण्याचे काम करणारा वर्ग दुसऱ्या बाजूला अशी विभागणी असू नये. श्रीमंत लोकांच्या ठायी पोकळ दंभ, दुराभिमान, आप्पलपोटेपणा व जुलमी वृत्ती असते. याउलट गरीब लोकांच्या वाट्याला असुरक्षितता, दारिद्र्य आणि अधःपतन येते. गरिबांना स्वातंत्र्य, स्वाभिमान, प्रतिष्ठा आणि स्वावलंबन यांचा समान लाभ घेता येत नाही. समाजातील हे वर्गीय भेदाभेद संपविण्यासाठी आणि लोकशाही अस्थिर करावयाची नसेल तर श्रीमंतांनी स्वेच्छेने त्यांच्याकडे असलेले विशेषाधिकार सोडले पाहिजेत.

विषमता आणि अन्यायकारक समाजरचना असलेल्या समाजामध्ये हिंसात्मक क्रांतीची बीजे असतात. यातून रक्तरंजित क्रांती उद्भवल्यास लोकशाहीला देखील ती थांबविणे शक्य होत नाही. त्यांनी लिंकन यांच्या गॅटिसबर्ग येथील भाषणातील एका विधानाचा उल्लेख केलेला आहे. विभागलेले घर तग धरू शकत नाही. ( House divided against itself can not stand.) याचा अर्थ वर्गसंघर्ष लोकशाहीच्या यशातील अडसर बनतात. एवढेच नव्हे तर ते लोकशाही नाशास आणि भलत्याच एखाद्या राज्यपद्धतीस जन्म देण्यास कारणीभूत ठरतात. डॉ. आंबेडकर म्हणतात, मी असे निःसंकोचपणे म्हणतो की, जगातील निरनिराळ्या भागातील इतिहासाचा अभ्यास केल्यास लोकशाहीच्या अपयशाचे कारण सामाजिक विषमता व वर्गावर्गातील उभी असलेली सत्तेची दरी हेच आहे असे दिसून येईल. याचा अर्थ वर्ण व वर्गव्यवस्थेतून उत्पन्न झालेली विषमता आणि अन्यायः हे लोकशाहीच्या यसिद्धीतील अडसर असतात.लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजिक व आर्थिक विषमता निर्मूलनासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता असते.

वर्णव्यवस्था सामाजिक विषमता निर्मितीस व ती टिकून राहण्यास कारणीभूत आहे. येथील समाजरचना व तत्त्वज्ञान लोकशाही विसंगतच नव्हे तर विरोधी आहे. वर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाज विविध जातींमध्ये विभागला गेलेला आहे. सामाजिक दर्जामध्ये असमानता निर्माण झाली. येथील दारिद्र्य, अज्ञान, शोषण, विषमता, अंधश्रद्धा, गुलामी, घृणा व तिरस्कार हे सामाजिक रोग या व्यवस्थेची देण आहे. वर्णव्यवस्थेमुळे सांप्रदायिकता वाढली. व्यक्ती विकासावर खोल परिणाम झाला. आर्थिक वृद्धीवर देखील परिणाम झाला. उच्चवर्गीय व उच्चवर्णीयांचे समाजावरचे वर्चस्व व नियंत्रण वाढले व प्रस्थापित झाले. वर्णव्यवस्थेमुळे एकसंघ राष्ट्र व समाज निर्माण होण्यास खीळ बसली. वर्णव्यवस्था न्याय व निकोप समाज घडविण्यास अडसर बनली. यामुळे सामाजिक विषमता समूळ नष्ट करण्यासाठी विचारपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सामाजिक विषमतेप्रमाणे आर्थिक विषमत्ता देखील लोकशाहीच्या यशातील मोठा अडसर आहे. श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. श्रीमंताकडे प्रचंड आर्थिक वैभव आहे; तर गरिबांना त्यांच्या किमान मूलभूत गरजांची पूर्तता करता येत नाही. ही जीवघेणी आर्थिक विषमता भांडवलशाहीपूरक धोरणामुळे वाढते. आर्थिक विषमतेची तीव्रता कमी करण्यासाठी सत्ता, संपत्ती आणि संसाधनांचे न्याय्य वाटप झाले पाहिजे. देशातील मूलभूत उद्योगांवर शासनाची मालकी असावी, उत्पादनाची साधने मूठभर श्रीमंत लोकांच्या हाती जाणार नाहीत, यासाठी शासनाने दक्षता बाळगावी. उद्योग व शेती यांचे राष्ट्रीयीकरण करावे. शासकीय आणि अतिरिक्त शेती जमिनीचे गरिबांमध्ये पुनवितरण करावे, देशामध्ये आर्थिक गुंतवणूक करताना आर्थिक लाभाबरोबर सामाजिक लाभाचादेखील प्रामुख्याने विचार केला पाहिजे, शासनाने सर्वांच्या शिक्षण व आरोग्याची जबाबदारी स्वीकारावी. त्यांना वाटते अशा प्रकारच्या उपाययोजनातून काही प्रमाणात का होईना आर्थिक विषमता कमी होईल.डॉ. आंबेडकरांनी समता मूल्याला सर्वोच्च स्थान दिलेले आहे. सामाजिक वा आर्थिक विषमता संपवून समाजामध्ये समता प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही, अशी त्यांची धारणा होती. एवढेच नव्हे तर त्यांनी लोकशाहीचे दुसरे नाव म्हणजे समता आहे; असे म्हटलेले आहे. त्यांच्या दृष्टीने समता लोकशाहीच्या दृष्टीने मूलभूत मूल्य आहे. ते लिहितात, Fraternity and liberty are really derivative nations. The basic and fundamental conceptions are equality and respect for human personality. Fraternity and liberty take their roots in these two fundamental conceptions. Digging further down it may be said that equality is the original nation and respect for human personality is a reflexion of it. So that where equality is denied, every thing else may be taken to be denied.

**विरोधी पक्ष**–लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रभावी व कार्यक्षम विरोधी पक्ष असावा लागतो. ज्या देशामध्ये विरोधी पक्ष नसतो तेथे लोकशाही असत नाही. विरोधी पक्षाची आवश्यकता भासत नसलेल्यांना लोकशाही काय चीज आहे; याचे संपूर्ण आकलन झालेले नसते. डॉ. आंबेडकर म्हणतात, लोकशाहीमध्ये दोन तुल्यबळ पक्ष असावे लागतात. शासन चालविण्यासाठी सत्ताधारी पक्ष असावा लागतो. पण ते शासन हुकुमशाही व्हावयाचे नसेल तर किमान दोन पक्ष असावे लागतात. सत्ताधारी व विरोधी पक्ष असे दोन पक्ष असल्याशिवाय लोकशाही अस्तित्वातच येऊ शकणार नाही. स्वातंत्र्याचे रहस्य धारिष्ट्यात असते आणि व्यक्तीने पक्षाच्या स्वरूपात एकजूट बांधण्यातून धारिष्ट्याचा जन्म होतो. शासन चालविण्यासाठी पक्ष असावा लागतो. मात्र शासनात एका पक्षाची सत्ता सतत राहिली तर तो पक्ष हुकूमशाहीकडे वाटचाल करू शकतो. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे महत्त्व लक्षात घेता पाश्चात्त्य राष्ट्रांत देखील विरोधी पक्षांना अत्यंत सन्मानाने वागविले जाते. पुढे ते लिहितात, इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाला नुसती मान्यताच दिली जाते, एवढेच नव्हे तर विरोधी पक्ष नेत्याला त्याच्या पक्षाचे कामकाज चालविता यावे म्हणून पगार दिला जातो. त्याला चिटणीस, टंकलेखक, कारकून असा लवाजमा पुरविला जातो. हाऊस ऑफ कॉमन्सच्या इमारतीतच त्याचे ऑफिस थाटून दिले जाते. कॅनडामध्ये देखील पंतप्रधानासारखाच विरोधी नेत्याला पगार दिला जातो. कारण उघड आहे. ह्या दोन्ही देशात सरकार चुकीच्या मार्गाने जात आहे की काय हे सांगणारांची आवश्यकता त्या लोकांना भासते. हे काम अविरतपणे व सातत्याने व्हावयास पाहिजे याची त्यांना निकड भासते आणि म्हणून ते विरोधी पक्षासाठी खर्च करावयास तत्पर असतात. हुकूमशाहीपासून दूर ठेवण्यासाठी दोन पक्ष असावे लागतात. राष्ट्रऐक्य वा अन्य कोणत्याही कारणास्तव एकपक्षीय पद्धतीचा स्वीकार करता कामा नये. एकपक्षीय शासन हे जुलूमशाहीला निमंत्रणच असते. लोकांच्या शासनाला ते मारकच असते. निवडणुकीच्या मार्गाने जरी तो एकमेवाद्वितीय पक्ष सत्तारूढ झाला तरी, तेवढ्याने हुकूमशाहीला पायबंद बसण्याची मुळीच हमी मिळत नाही.

विरोधी पक्षाचे सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण असणे आवश्यक असते. लोकशाही ही एका अर्थाने सत्तेवरील नियंत्रण असते. सत्तेचे नियंत्रण ही संकल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात, वंश परंपरागत सत्ता व सरंजामदारशाही (सनातनशाही) यांच्या नेमका उलटा शब्द

म्हणजे लोकशाही, लोकशाहीचा अर्थच हा की, सत्तारूढ मंडळीच्या अमर्याद सत्तेला कोठेतरी केलेले नियंत्रण, झोटिंगशाहीमध्ये नियंत्रणाला वावच नसतो. राजाच्या सत्तेवर कोणाचेही नियंत्रण नसतेः परंतु लोकशाहीत आपण अशी व्यवस्था केलेली असते की ज्यामुळे सत्तारूढ़ असलेल्या मंडळीना दर पाच वर्षांनी लोकापुढे जावे लागते. आणि ते सत्तास्थानी राहावयास लायक आहेत की नाहीत, लोकांचा सांभाळ आणि संरक्षण करण्यास समर्थ आहेत की नाही या प्रश्नावर लोकांचा कौल घ्यावा लागतो, यालाच मी सत्तेवरील नियंत्रण (Voto Power) म्हणतो. परंतु दर पाच वर्षांनी फक्त एकदा लोकमताचा कोल घेण्याच्या आधी मधल्या काळात अनियंत्रित सत्ता वापरण्याच्या ह्या पंचवार्षिक नियंत्रणामुळे खरीखुरी लोकशाही येत नाही. लोकशाहीमध्ये राज्यसत्तेवर लोकमताचे नियंत्रण नुसतेच हवे असे नाही तर ते तात्काळ व सतत असावयास हवे. लोकसभेमध्ये (पार्लमेंट-कायदेमंडळ) सरकारला तेथल्या तेथे अडविणारे व आव्हान देणारे लोक असावे लागतात. विरोधी पक्षाचे महत्त्व यावरून तुम्हाला कळेल.लोकशाही जीवंत ठेवण्यामध्ये विरोधी पक्षाची महत्त्वाची भूमिका असते. विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यावर अंकुश ठेवतात. ते सत्ताधाऱ्याच्या समाजविरोधी व चुकीच्या धोरणांना कडाडून विरोध करतात व सत्ताधाऱ्यांना लोकहिताचे काम करण्यासाठी भाग पाडतात. त्यांच्यामुळे नागरिकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षण होते. समाजातील वंचित व शोषित लोकसमूहाला संघटित करून त्यांना त्यांचे हक्क व न्याय प्राप्त करून देण्यासाठी व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समतेची लढाई लढण्यासाठी विरोधी पक्षाची मदत होते. विरोधी पक्षामुळे लोकांची गा-हाणी सरकारपर्यंत पोहोचविली जातात. विरोधी पक्षामुळे कोणत्याही प्रश्नाची दुसरी बाजू लोकांसमोर येते. विरोधी पक्ष पदाधिकारी व अधिकारी यांचे गैरव्यवहार लोकांच्या समोर उघडकीस आणतात. विरोधी पक्षाचा सत्ताधाऱ्यांवर वचक असल्यामुळे सत्ताधारी सत्तेचा गैरवापर करू शकत नाहीत. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळे सत्तारूढ सरकारचो ध्येयधोरणे तापवून ऐरणीवर ठोकून नीटनेटके करण्याची व्यवस्था असते. सत्ताधारी पक्षाला आपल्या धोरणाचे, राज्यकारभाराचे समर्थन त्या पक्षात नसलेल्या लोकांच्या शंकांचे निरसन सततपणे करावे लागते. लोकशाही सुयोग्य व निरपेक्षपणे राबवायची असेल तर कोणत्याही एका पक्षाची निरंकुश सत्ता असता कामा नये. लोकशाहीमध्ये निष्ठा कोणत्यातरी एका पक्षाकडे गहाण ठेवणे म्हणजे लोकशाहीच्या अंताची पूर्वतयारी ठरेल. सत्ताधारी पक्षानी स्वपक्षातील लोकांना संधी व सवलती देताना विरोधी पक्षाची उपेक्षा होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षाला सन्मानाने वागविले पाहिजे. त्यांच्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. विरोधी पक्षाची बिले, ठराव वा सूचना धुडकावून लावू नयेत. तसे होत राहिले तर मात्र विरोधी पक्षाच्या मनात असंतोष उत्पन्न होतो. त्यांच्यामध्ये लोकशाहीला घातक अशी द्वेषभावना उत्पन्न होऊ शकते. सत्ताधारी पक्षांनी विरोधी पक्षांची अप्रतिष्ठा, अवहेलना आणि अपमान करता कामा नये.

प्रसिद्धीमाध्यमांनी सत्ताधा-याप्रमाणे विरोधी पक्षांनादेखील प्रसिद्धी दिली पाहिजे: परंतु वास्तवात तसे घडत नाही. प्रसिद्धीमाध्यमाच्या पक्षपाती भूमिकेवर भाष्य करताना ते लिहितात, दुर्दैवाने आपल्या देशातील बहुतेक वर्तमानपत्र सरकारी जाहिरातीच्या उत्पन्नासाठी म्हणा किंवा अन्य कारणांसाठी म्हणा सरकारी पक्षाला जास्त उचलून धरतात. विरोधी पक्षाला प्रसिद्धी देत नाहीत. विरोधी पक्षाकडून त्यांना काय मिळणार ? सरकारकडून त्यांना जाहिरातीचा पैसा मिळतो आणि मग काय, सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या भाषणाची प्रतिवृत्ते रकानेच्या रकाने भरून ही वृत्तपत्रे प्रसिद्ध करतात. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेली भाषणे अगदी त्रोटकपणे शेवटच्या पानावर, कोठेतरी कोपऱ्यात जातात आणि म्हणूनच लोकशाही यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्षाची आवश्यकता आहे. आजदेखील प्रसिद्धीमाध्यमे विरोधो पक्षाला सत्ताधारी पक्षाच्या तुलनेने कमी प्रसिद्धी देतात.

**वैधानिक आणि प्रशासकीय समता**–

लोकशाहीच्या यशासाठी देशामध्ये वैधानिक व प्रशासकीय समता असणे आवश्यक आहे, केवळ कायद्याचे राज्य (Rule of Law) पुरेसे नाही. सर्व जाती, धर्म व पक्षाच्या नागरिकांना कायदा व प्रशासनामध्ये न्याय व समान वागवणूक मिळाली पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासक जर निःपक्ष, निष्कलंक, प्रामाणिक, निर्भीड आणि अभ्रष्ट असतील तर सर्वांना न्याय व समान वागवणूक मिळणे शक्य होते. सत्ता आणि प्रशासनावर कोणत्या एका वर्ग वा वर्णाची मक्तेदारी असू नये. मक्तेदारीमुळे शोषित, दुर्बल आणि वंचित लोकांना न्याय मिळत नाही. राज्यसत्ता निरंकुश असता कामा नये. राज्यकारभार राज्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे वा लहरीप्रमाणे न चालता तो विवेकाने व कायद्याप्रमाणे चालला पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी करताना पक्षपात होता कामा नये. एकाला एक कायदा आणि दुसऱ्याला एक कायदा अशी व्यवस्था असेल तर ती लोकशाहीची विटंबना ठरेल. यामुळे शासनानी सर्व नागरिकांना समान लेखले पाहिजे. शासनकर्त्यांकडे राज्यकारभार चालविताना समतेची दृष्टी असावी लागते. राज्यकर्त्या पक्षाने अन्य पक्षांना सापत्नभावाची वागणूक देऊ नये. त्यांनी स्वतःच्या पक्षातील कार्यकर्त्यांना इतरांपेक्षा अधिक सवलती व सोयी देऊ नये. सत्ताधारी व विरोधी पक्षातील सर्व कार्यकर्त्यौना समान वागणूक दिली पाहिजे. सत्ताधारी पक्षांनी सत्तेवर येताच पूर्वीच्या पक्षाने नेमलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलता कामा नये, सत्ता संपादनासाठी ज्या कर्मचाऱ्यांनी साह्य केले अशांची नेमणूक केल्याने प्रशासनाची गुणवत्ता ढासळते, कर्मचारी आणि अधिकारी यांच्या मनोबलाचे खच्चीकरण होते. राज्यकारभारामध्ये वशिलेबाजी झाल्यास प्रशासनामध्ये समता राहणार नाही. प्रशासनाचे म्हणजे लोकशाही, लोकशाहीचा अर्थच हा की, सत्तारूढ मंडळीच्या अमर्याद सत्तेला कोठेतरी केलेले नियंत्रण, झोटिंगशाहीमध्ये नियंत्रणाला वावच नसतो. राजाच्या सत्तेवर कोणाचेही नियंत्रण नसतेः परंतु लोकशाहीत आपण अशी व्यवस्था केलेली असते की ज्यामुळे सत्तारूढ़ असलेल्या मंडळीना दर पाच वर्षांनी लोकापुढे जावे लागते. आणि ते सत्तास्थानी राहावयास लायक आहेत की नाहीत, लोकांचा सांभाळ आणि संरक्षण करण्यास समर्थ आहेत की नाही या प्रश्नावर लोकांचा कौल घ्यावा लागतो, यालाच मी सत्तेवरील नियंत्रण (Voto Power) म्हणतो. परंतु दर पाच वर्षांनी फक्त एकदा लोकमताचा कोल घेण्याच्या आधी मधल्या काळात अनियंत्रित सत्ता वापरण्याच्या ह्या पंचवार्षिक नियंत्रणामुळे खरीखुरी लोकशाही येत नाही. लोकशाहीमध्ये राज्यसत्तेवर लोकमताचे नियंत्रण नुसतेच हवे असे नाही तर ते तात्काळ व सतत असावयास हवे. लोकसभेमध्ये (पार्लमेंट-कायदेमंडळ) सरकारला तेथल्या तेथे अडविणारे व आव्हान देणारे लोक असावे लागतात. विरोधी पक्षाचे महत्त्व यावरून तुम्हाला कळेल.लोकशाही जीवंत ठेवण्यामध्ये विरोधी पक्षाची महत्त्वाची भूमिका असते. विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यावर अंकुश ठेवतात. ते सत्ताधाऱ्याच्या समाजविरोधी व चुकीच्या धोरणांना कडाडून विरोध करतात व सत्ताधाऱ्यांना लोकहिताचे काम करण्यासाठी भाग पाडतात. त्यांच्यामुळे नागरिकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षण होते. समाजातील वंचित व शोषित लोकसमूहाला संघटित करून त्यांना त्यांचे हक्क व न्याय प्राप्त करून देण्यासाठी व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समतेची लढाई लढण्यासाठी विरोधी पक्षाची मदत होते. विरोधी पक्षामुळे लोकांची गा-हाणी सरकारपर्यंत पोहोचविली जातात. विरोधी पक्षामुळे कोणत्याही प्रश्नाची दुसरी बाजू लोकांसमोर येते. विरोधी पक्ष पदाधिकारी व अधिकारी यांचे गैरव्यवहार लोकांच्या समोर उघडकीस आणतात. विरोधी पक्षाचा सत्ताधाऱ्यांवर वचक असल्यामुळे सत्ताधारी सत्तेचा गैरवापर करू शकत नाहीत. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळे सत्तारूढ सरकारचो ध्येयधोरणे तापवून ऐरणीवर ठोकून नीटनेटके करण्याची व्यवस्था असते. सत्ताधारी पक्षाला आपल्या

धोरणाचे, राज्यकारभाराचे समर्थन त्या पक्षात नसलेल्या लोकांच्या शंकांचे निरसन सततपणे करावे लागते. लोकशाही सुयोग्य व निरपेक्षपणे राबवायची असेल तर कोणत्याही एका पक्षाची निरंकुश सत्ता असता कामा नये. लोकशाहीमध्ये निष्ठा कोणत्यातरी एका पक्षाकडे गहाण ठेवणे म्हणजे लोकशाहीच्या अंताची पूर्वतयारी ठरेल. सत्ताधारी पक्षानी स्वपक्षातील लोकांना संधी व सवलती देताना विरोधी पक्षाची उपेक्षा होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षाला सन्मानाने वागविले पाहिजे. त्यांच्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. विरोधी पक्षाची बिले, ठराव वा सूचना धुडकावून लावू नयेत. तसे होत राहिले तर मात्र विरोधी पक्षाच्या मनात असंतोष उत्पन्न होतो. त्यांच्यामध्ये लोकशाहीला घातक अशी द्वेषभावना उत्पन्न होऊ शकते. सत्ताधारी पक्षांनी विरोधी पक्षांची अप्रतिष्ठा, अवहेलना आणि अपमान करता कामा नये.

प्रसिद्धीमाध्यमांनी सत्ताधा-याप्रमाणे विरोधी पक्षांनादेखील प्रसिद्धी दिली पाहिजे: परंतु वास्तवात तसे घडत नाही. प्रसिद्धीमाध्यमाच्या पक्षपाती भूमिकेवर भाष्य करताना ते लिहितात, दुर्दैवाने आपल्या देशातील बहुतेक वर्तमानपत्र सरकारी जाहिरातीच्या उत्पन्नासाठी म्हणा किंवा अन्य कारणांसाठी म्हणा सरकारी पक्षाला जास्त उचलून धरतात. विरोधी पक्षाला प्रसिद्धी देत नाहीत. विरोधी पक्षाकडून त्यांना काय मिळणार ? सरकारकडून त्यांना जाहिरातीचा पैसा मिळतो आणि मग काय, सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या भाषणाची प्रतिवृत्ते रकानेच्या रकाने भरून ही वृत्तपत्रे प्रसिद्ध करतात. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेली भाषणे अगदी त्रोटकपणे शेवटच्या पानावर, कोठेतरी कोपऱ्यात जातात आणि म्हणूनच लोकशाही यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्षाची आवश्यकता आहे. आजदेखील प्रसिद्धीमाध्यमे विरोधो पक्षाला सत्ताधारी पक्षाच्या तुलनेने कमी प्रसिद्धी देतात.

वैधानिक आणि प्रशासकीय समता

लोकशाहीच्या यशासाठी देशामध्ये वैधानिक व प्रशासकीय समता असणे आवश्यक आहे, केवळ कायद्याचे राज्य (Rule of Law) पुरेसे नाही. सर्व जाती, धर्म व पक्षाच्या नागरिकांना कायदा व प्रशासनामध्ये न्याय व समान वागवणूक मिळाली पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासक जर निःपक्ष, निष्कलंक, प्रामाणिक, निर्भीड आणि अभ्रष्ट असतील तर सर्वांना न्याय व समान वागवणूक मिळणे शक्य होते. सत्ता आणि प्रशासनावर कोणत्या एका वर्ग वा वर्णाची मक्तेदारी असू नये. मक्तेदारीमुळे शोषित, दुर्बल आणि वंचित लोकांना न्याय मिळत नाही. राज्यसत्ता निरंकुश असता कामा नये. राज्यकारभार राज्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे वा लहरीप्रमाणे न चालता तो विवेकाने व कायद्याप्रमाणे चालला पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी करताना पक्षपात होता कामा नये. एकाला एक कायदा आणि दुसऱ्याला एक कायदा अशी व्यवस्था असेल तर ती लोकशाहीची विटंबना ठरेल. यामुळे शासनानी सर्व नागरिकांना समान लेखले पाहिजे. शासनकर्त्यांकडे राज्यकारभार चालविताना समतेची दृष्टी असावी लागते. राज्यकर्त्या पक्षाने अन्य पक्षांना सापत्नभावाची वागणूक देऊ नये. त्यांनी स्वतःच्या पक्षातील कार्यकर्त्यांना इतरांपेक्षा अधिक सवलती व सोयी देऊ नये. सत्ताधारी व विरोधी पक्षातील सर्व कार्यकर्त्यौना समान वागणूक दिली पाहिजे. सत्ताधारी पक्षांनी सत्तेवर येताच पूर्वीच्या पक्षाने नेमलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलता कामा नये, सत्ता संपादनासाठी ज्या कर्मचाऱ्यांनी साह्य केले अशांची नेमणूक केल्याने प्रशासनाची गुणवत्ता ढासळते, कर्मचारी आणि अधिकारी यांच्या मनोबलाचे खच्चीकरण होते. राज्यकारभारामध्ये वशिलेबाजी झाल्यास प्रशासनामध्ये समता राहणार नाही. प्रशासनाचे

संतुलन बिघडेल. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये एके काळी सत्ताधा-यांच्या प्रशासनातील राजकीय हस्तक्षेपामुळे फार मोठी हानी झालेली होती.सत्ताधाऱ्यांनी चांगली धोरणे ठरवावीत पण त्यांची अंमलबजावणी करताना दैनंदिन प्रशासनामध्ये हस्तक्षेप मात्र टाळावा; परंतु दुर्दैवाने अनेकदा लोकप्रतिनिधी आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्याकडून प्रशासनामध्ये हस्तक्षेप होताना आढळतो. तसेच काही प्रसंगी प्रशासकीय अधिकारीदेखील कायदा व धोरणे यांची अंमलबजावणी करताना पक्षपात करतातः लोकशाहीसाठी ही बाब घातक असते.

संविधानात्मक नीती

लोकशाही यशस्वी होण्यासाठी सर्वांनी संविधानात्मक नीतीचे (Constitutional Morality) पालन करणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांनी संविधानात्मक नीतीला सर्वोच्च महत्त्व दिलेले आहे. ते लिहितात, क्रीडा क्षेत्रामध्ये ज्याप्रमाणे काही नियम असतात आणि त्याचे पालन क्रीडाकर्मीला करावेच लागते तसेच लोकशाहीत संविधान पालनासाठी काही नियम असतात आणि त्यांचे पालन करणे म्हणजे संविधानात्मक नीतिमत्ता होय. संविधान केवळ कायदेशीर तरतुदीचा आणि तत्त्वांचा सांगडा असतो. संविधानात्मक नीतीच्या पालनातून संविधानाला आशय प्राप्त होतो. यामुळे कोणाही तात्पुरत्या लाभासाठी वा लोभापोटी संविधानात्मक नीतीचे उल्लंघन करू नये. तसे केल्यास लोकशाही आणि संविधान यांना इजा पोहोचते. पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये संविधानात्मक नीतीमत्तेचे काटेकोर पालन केले जाते, हे सांगताना त्यांनी अमेरिका आणि इंग्लंड या दोन राष्ट्रांतील घटनांचा उल्लेख केला आहे. ते लिहितात, अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष जॉर्ज वाशिंग्टन अमेरिकेत सर्वात लोकप्रिय नेते होते. अमेरिकेची घटना लिहून झाल्यानंतर त्यांची पहिले राष्ट्रध्यक्ष म्हणून निवड झाली. परंतु त्यांची अध्यक्षपदाची मुदत संपल्यानंतर त्यांनी दुस-यांदा अध्यक्ष होण्यास नकार दिला. त्याला कारण विचारले असता ते म्हणाले, माझ्या प्रिय देशबंधूंनो ही घटना आपण ज्या हेतूने बनविली त्याचा तुम्हाला विसर पडलेला दिसतो. आपल्याला वंशपरत्वे चालणारी राजेशाही, वंशपरंपरेने येणारा राजा किंवा हुकूमशहा नको होता म्हणूनच आपण ही घटना बनविली. इंग्लिश राजाशी तुम्ही या हेतूनेच प्रेरित होऊन संबंध तोडले आहेत. मग माझी पूजा करून मला जर तुम्ही वर्षानुवर्षे अध्यक्ष बनवू लागलात तर तुमच्या तत्त्वाचे काय होईल ? इंग्लिश राजाच्या ठिकाणी माझी स्थापना करून तुम्ही असे म्हणू शकाल काय की इंग्लिश राजाच्या सत्तेविरुद्ध तुम्ही केलेला उठाव हा योग्य होता ? तसे तुम्ही कोणत्या तोंडाने म्हणू शकाल? माझ्यावरील प्रेमामुळे व श्रद्धेमुळे तुम्ही जरी मला दुसऱ्यांदा उभे राहण्याचा आग्रह करू लागलात तरी तुमच्या या भावविवशतेला बळी न पडण्याचे काम, वंशपरंपरागत सत्ताशाहीचा बिमोड करण्याच्या तत्त्वज्ञानाचा उद्गाता म्हणून मला कर्तव्यबुद्धीने पार पाडावेच लागणार. परंतु लोकआग्रहास्तव त्यांना दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष व्हावे लागले पण तिसऱ्यांदा त्यांनी अध्यक्षपद कठोरपणे झिडकारले.

डॉ. आंबेडकरांनी दुसरे उदाहरण इंग्लंड येथील आठव्या जॉर्ज यांचे दिलेले आहे. ते लिहितात, राजाने त्याला हव्या असलेल्या स्त्रीशी लग्न करावे की नाही आणि त्याने तसे लोकमताच्या व ठरलेल्या संकेताच्या विरुद्ध जाऊन लग्न केल्यास त्याला सिंहासनावर ठेवायचे की नाही ? या प्रश्नावर प्रचंड चर्चा झाली. तत्कालीन हुजूरपक्षाचे पंतप्रधान बाल्डवीन राजाच्या लग्नाच्या विरोधात होते. ते राजाला म्हणाले, तू जर माझे ऐकले नाहीस तर तुला राजपद सोडावे लागेल. कारण राजाने ठरवलेले लग्न तेथील संकेताला धरून नव्हते. परंतु चर्चिल राजा एडवर्ड यांचे मित्र होते व ते त्यांच्या पाठीशी उभे राहण्यास तयार होते. मजूरपक्ष हा तेव्हा विरोधी पक्ष होता. मजूरपक्षातील काही सदस्य या मताचे होते की हुजूरक्षातील फाटाफुटीचा फायदा घेऊन पंतप्रधान बाल्डवीन यांचा पराजय करावा; परंतु त्यावेळी प्रोफेसर लॉस्की हेरॉल्ड (मजूरपक्ष) यांनी नियतकालिकात लेखांमागे लेख लिहून मजूरपक्षाने तसे करू नये म्हणून बजावीत होते. अशा हालचालीचा निषेध करीत होते. ते म्हणत होते, आपण घटनात्मक संकेताने एक गोष्ट मान्य केली आहे की पंतप्रधानाचा सल्ला राजा मानील आणि त्यांनी तसा तो न मानल्यास पंतप्रधान राजाला घालवून देऊ शकेल. हा असा आपला सर्वमान्य संकेत असल्याने ज्यायोगे राजाचे अधिकारक्षेत्र वाढेल अशी वर्तवणूक करून प्रश्नावर बाल्डवीनचा पराजय करणे चुकीचे ठरेल. मजूरपक्षाने त्यांचा सल्ला मान्य केला. अशा प्रकारच्या भूमिकांमुळे लोकशाही व संविधानाला हानी पोहोचत नाही उलट त्यांचे संरक्षण होते.नागरिकांनीदेखील कर्तव्यभावनेने संविधानात्मक नीतीचे पालन केले पाहिजे. त्याचे आचरण संविधानानुसार असावे. त्यांनी संविधान विरोधी आचरण टाळावे. प्रत्येक नागरिकांना विचार-आचाराचे स्वातंत्र्य दिले पाहिजे; परंतु त्यांनी स्वातंत्र्याचा वापर करताना संविधान आणि कायदा यांचे उल्लंघन होणार नाही, याविषयी दक्षता बाळगली पाहिजे. नैतिक आचरणावर लोकशाहीची इमारत उभी राहते, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.अल्पसंख्याकांची सुरक्षितता लोकशाही यशसिद्धीसाठी समाजातील अल्पसंख्याक समूहाला त्यांच्या विकास आणि संरक्षणाची हमी मिळाली पाहिजे. त्यांची मुस्कटदाबी होता कामा नये. त्यांच्या मताचा आदर केला जावा. त्यांना विरोधी मत देखील मांडण्याची संधी व स्वातंत्र्य दिले जावे. त्यांना त्यांच्या दुःख व प्रश्नांना वाचा फोडता आली पाहिजे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे अन्याय व अत्याचार होता कामा नये. त्यांच्या हिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताचे अधिराज्य नव्हे. लोकशाहीमध्ये धोरणात्मक निर्णय एकमताने व संमतीने घेतले पाहिजे. हक्काचा लाभ समाजातील अधिकाधिक लोकांना करून देणे आणि अल्पसंख्याकाच्या हक्काचे संरक्षण करण्याचे सौजन्य बहुसंख्याकाकडे असणे हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण असते. बहुसंख्याक मंडळी जरी सत्ताधीश असली तरी ते आपल्यावर अन्याय करणार नाहीत व आपल्याला इजा पोहचवणार नाहीत, अशी भावना अल्पसंख्याकाची बनली पाहिजे. या संदर्भात डॉ. आंबेडकर लिहितात, There is other thing which is very necessary in the working of democracy and it is this that in the name of democracy there must be no tyranny of majority over the minority. The minority must always feel safe that although the mojority is carrying the government, the minority is not being hurt or the minority is not being hit below the belt. यासंदर्भात इंग्लंडचे उदाहरण देताना ते म्हणतात, इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्स (लोकसभा) मध्ये ह्या तत्त्वाचा मान फार राखला जातो. इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाच्या प्रचंड बहुमताखाली या अल्पसंख्याक मजूर पक्षाकडून भाषणाबद्दल, तहकुबी सूचनाबद्दल वा अन्य विरोध करणाऱ्या पद्धतीबद्दल हुजूर पक्षाकडून कधी गळचेपी किंवा अन्याय झाल्याची तक्रार मला ऐकायला मिळाली नाही. आपल्या लोकसभेचे उदाहरण घ्या. विरोधी पक्षांचे सभासद सदासर्वकाळ आणीत असलेले निंदाव्यंजक ठराव, तहकुबी सूचना मांडत असणे हे काही चांगले लक्षण नाही. हे काहीही असे असले तरी एखादी सूचना ग्राह्य करून तिच्यावरील चर्चेस परवानगी दिल्याचे तुम्हाला क्वचितच ऐकायला मिळेल. ह्या गोष्टीबद्दल मला अचंबा वाटतो. इंग्लिश पार्लमेंटच्या कामकाजाच्या

माझ्या वाचनात तहकुबी सूचना अमान्य केल्याचे उदाहरण क्वचितच आले असेल. सत्ताधाऱ्यांनी कायदेमंडळामध्ये अल्पमतात असलेल्या विरोधी पक्षाला त्यांची मते मांडण्याची संधी दिली पाहिजे तशी संधी नाही

दिली तर विरोधी पक्षाच्या मनामध्ये तिरस्काराची भावना निर्माण होऊ शकते.लोकशाही टिकण्यासाठी आपल्यावर सतत अन्याय होतो, अशी भावना अल्पसंख्याकांमध्ये उत्पन्न होणार नाही यासंबंधी शासन आणि न्यायालयांनी सतर्क राहिले पाहिजे; कारण त्यामुळे समाज स्थिर राहील. अल्पसंख्याकांचे शोषण व दमन होणे हे लोकशाही व मानवतावाद विरोधी असते. अल्पसंख्याकांवर सतत अन्याय झाला, त्यांची उपेक्षा व अप्रतिष्ठा झाल्यास ते बंड करू शकतात. अल्पसंख्याकामध्ये स्फोटक शक्ती असते. तिचा स्फोट झाल्यास समाज व देश यांची वीण विस्कटली जाऊ शकते. यामुळे अल्पसंख्याकांचे अस्तित्व व महत्त्व नाकारणे, ही मोठी चूक ठरू शकते, याची जाणीव बहुसंख्याकांनी वा सत्ताधाऱ्यांनी ठेवली पाहिजे. लोकशाहीचे जतन करण्यासाठी ही बाब आवश्यक आहे.

**नीतिमान समाज**–लोकशाही यशस्वी होण्यासाठी समाज नीतिमान असावा लागतो. राज्यशास्त्रज्ञांनी नीतिमान समाज घडविण्याकडे लक्ष दिले पाहिजे; परंतु डॉ. आंबेडकरांना वाटते राज्यशास्त्रज्ञ याकडे पुरेस गांभीर्याने लक्ष देत नाहीत. ते लिहितात, नीतिशास्त्र हे राज्यशास्त्राहून काहीतरी अलग प्रकरण आहे असे मानण्यात येते. त्यांचा अन्योन्य काहीच संबंध नाही असे समजले जाते. नीतिमत्तेशिवाय राजकारण करता येते या समजुतीने राजकारणाचा अभ्यास करणाऱ्याला नीतिशास्त्राचा गंध नसला तरी चालेल असा प्रवाह आहे. माझ्या मते हा प्रवाह महाभयंकर व गंभीर स्वरूपाचा आहे. सुप्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ प्रा. लास्की यांनीदेखील लोकशाही यशासाठी सामाजिक नीतिमत्तेची आवश्यकता आहे, असे म्हटले आहे. ते म्हणतात लोकशाही राज्यपद्धतीमध्ये समष्टीतील नीतिमान जीवन गृहीत धरलेले असते. सामाजिक नीतीच्या अभावी लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. ती छिन्नविछिन्न होईल. आपल्या देशामध्ये हा अनुभव आपल्याला मिळतो आहे.

लोकशाही म्हणजे स्वतंत्र सरकार असे मानले जाते. स्वतंत्र सरकार म्हणजे अशी राज्यपद्धती की जिच्यामध्ये जास्तीत जास्त सामाजिक क्षेत्रांमध्ये लोकांना कायद्याच्या हस्तक्षेपाशिवाय मोकळेपणाने जीवन जगता येते. परंतु नागरिकामध्ये देखील कायदा पाळला जाण्याइतपत सामाजिक नीती असली पाहिजे. व्यक्ती व समाज यांच्या नैतिक आचरणावर लोकशाहीची इमारत सुरक्षितरित्या उभी राहू शकते.

**विवेकबुद्धी**–लोकशाही यशसिद्धीसाठी समाजामध्ये सार्वजनिक विवेकबुद्धी वा विवेकी लोकमत (Public Concience) असणे आवश्यक आहे. समाजामध्ये नेहमीच शासन वा उच्च वर्गीय व उच्च वर्षीय यांच्याकडून सामान्य माणसावर अन्याय होत असतो. त्या अन्यायाच्या विरुद्ध प्रतिकार करण्याच्या प्रवृत्तीला ते विवेकबुद्धी म्हणतात. विवेकबुद्धीचा अर्थ स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे, अन्याय कोणावरही होत असो, अन्याय दिसला रे दिसला की जागृत होऊन उठणारी शक्ती म्हणजे समष्टीची विवेकबुद्धी होय. वर्ग, वर्ण, वंश वा धर्म यांचा विचार न करता जे लोक अन्यायाविरुद्ध खंबीरपणे उभे राहतात ते लोकशाहीचे समर्थक व संरक्षक असतात. अशाची समाजनिष्ठा व कर्तव्यनिष्ठा लोकशाहीला आधार देते. यासंदर्भात त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील एका घटनेचा दाखला दिलेला आहे. ते लिहितात, दक्षिण आफ्रिकेमध्ये अन्यायाला बळी पडणारे लोक हिंदी होते. तेथील गोऱ्या लोकांना कोणत्याही प्रकारची झळ पोहोचत नव्हती. असे असतानाही तेथील रेव्हरंड स्कॉट हा गोरा माणूस हिंदी लोकावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी जीवाचे रान करीत होता. तसेच गोऱ्या वंशाची मुले देखील भारतीयांच्या बाजूने लढली. त्यातून त्यांच्या लोकनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा आणि विवकबुद्धीचे आपणाला दर्शन होते. पुढे ते म्हणतात, भारतामध्ये गेली हजारो वर्षे अस्पृश्यांवर माणुसकीला काळिमा फासणारे सतत अन्याय झालेले आहेत. भारतातील प्रत्येक खेड्यात एक दक्षिण आफ्रिका असूनही भारतातील सवर्ण जातीतील माणूस अस्पृश्यांच्या बाजूने लढताना क्वचितच दिसतो. परंतु लोकांना अशा अन्यायाविरुद्ध उभे राहणे आवश्यक आहे. विवेक जागृत ठेवून अन्यायग्रस्तांच्या बाजूने लोक उभे राहिल्यास लोकशाही यशस्वी होण्यास साह्य होते, अशी त्यांची धारणा होती. विवेकबुद्धीचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी त्यांच्या 'Annihilation of Cast' या ग्रंथामध्ये इऑडच्या विवेकाच्या संदर्भातील विधानाचा उल्लेख केला आहे. ड्रऔंड म्हणतात, जो विवेकाचा वापर करील तो धर्मांध आहे. जो विवेकाचा वापर करू शकत नाही तो मुर्ख आहे आणि त्याच्याजवळ विवेकाचा वापर करण्याचे धैर्य नाही तो गुलाम आहे. विवेकशील व्यक्ती व समाज ही लोकशाहीच्या यशाची महत्त्वाची अट आहे.

डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीसंबंधी मांडलेले विचार मौलिक व उपयुक्त आहेत. त्यांची लोकशाहीची संकल्पना सर्वसमावेशक आहे. त्यांनी लोकशाही संकल्पनेचे विश्लेषण स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, हक्क, समाजबाद व धर्मनिरपेक्षता आदि संकल्पनेसह केलेले आहे. तत्त्वज्ञ विड्गेन्स्टाईन भाषेत त्यांची लोकशाहीची संकल्पना कुटुंबसदृश्य संकल्पना आहे. अत्यंत दृष्टेपणाने, डोळसरीत्या आणि तळमळीने मांडलेले त्यांचे लोकशाहीविषयक चिंतन काळाच्या पुढचे व नावीन्यपूर्ण आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही ही त्यांची नवीन संकल्पना वंचित व शोषितांसाठी उद्धारक ठरणारी आहे. मानवी प्रतिष्ठा, मानवी स्वातंत्र्य आणि मानवी कल्याण हे त्यांच्या लोकशाही संकल्पनेचे मुख्य ध्येय होते. लोकशाहीच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये हिंसेविना क्रांतिकारक बदल घडून आणता येतात, हा त्यांचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. ते लोकशाहीकडे सामाजिक क्रांती व सामाजिक पुनर्रचनेची सर्वोत्तम शासन पद्धती म्हणून पाहतात. त्यांनी लोकशाही यशस्वी होण्यासाठी सांगितलेल्या अटी कालातीत व दिशादिग्दर्शक आहेत. आज भारतीय लोकशाही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. आजच्या लोकशाहीच्या आव्हानात्मक परिस्थितीवर डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही चिंतनाच्या साहाय्याने मात करता येईल, असे आम्हास वाटते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**जळकोट (माधव होनराव)** महामानव विश्वरत्न पं. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त जळकोट शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जयंती मो-हत्सव समितीचे अध्यक्ष माजी प्राचार्य संपत शिगाडे यांनी जळकोट येथील पत्रकार परिषदेत दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या सार्वजनिक जयंती महोत्सवामध्ये ता. १३ एप्रिल रोजी रात्री बारा वाजता अतिषबाजी करण्यात आली. ता. १४ रोजी सकाळी ९:३० वाजता नगराध्यक्ष प्रभावती कांबळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पुजन, त्यानंतर पाच मिनिटानी मा. नगराध्यक्ष किशन बोधले यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण, ९: ४० वाजता उपनगराध्यक्ष मन्मथ आप्पा किडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन , १० : वाजता मा. नगराध्यक्ष व्यंकट तेलंग यांच्या हस्ते नालंदा बुद्धविहार येथे ध्वजारोहन, १० : ३० वाजता नालंदा बसस्थानक सभापती विठ्ठल चव्हाण व गटनेते ॲड. तात्या पाटील यांच्या हस्ते फ्फलकाचे अनावरण , सकाळी ११ : ०० राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ता. अध्यक्ष संग्राम हासुळे व सौ. सुरेखा गवळे यांच्या उपस्थितीत मोटारसायकल रॅली , दुपारी १:०० वाजता भोजनदान , आशोक कारभारी यांच्या उपस्थितीत सायंकाळी ४ :०० वाजता पुर्णाकृती पुतळ्याची मिरवणूक काढण्यात येणार आहे.तसेच ता. २१ एप्रिल रोजी सायंकाळी ६:०० वाजता प्रा. विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान, ता. २४ एप्रिल रोजी रात्री ८ : ०० वाजता रॉंकस्टार संतोष जोधळे यांचा बुद्ध भिमगीताचा सुरेल नजराणा आदि कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रमास जळकोट शहर व तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन डॉं. बाबासहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती मोहत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार पठाण इमरानखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १३/०५/१९८५ रोजी मौजे उदगीर ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार पठाण इमरानखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक १३/०५/१९८५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १३/०५/१९८५ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय अर्जदार पठाण इमरानखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १३/०५/१९८५ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २१/०४/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार पठाण फेरोजखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०५/१९८३ रोजी मौजे उदगीर ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सद-रील अर्जदार पठाण फेरोजखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०५/१९८३ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १५/०५/१९८३ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय अर्जदार पठाण फेरोजखान अहमदपाशा रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०५/१९८३ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २१/०४/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार पठाण अजमद अहमदपाशा रा. एस.टी. कॉलनी, नळेगाव रोड मलकापुर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १२/०१/१९७९ रोजी मौजे दावणगाव ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार पठाण अजमद अहमदपाशा रा. एस.टी. कॉलनी, नळेगाव रोड मलकापुर ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक १२/०१/१९७९ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १२/०१/१९७९ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय अर्जदार पठाण अजमद अहमदपाशा रा. एस.टी. कॉलनी, नळेगाव रोड मलकापुर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १२/०१/१९७९ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २६/०३/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २७/०४/२०२४


Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

# अखेर हिरकणीने समाज-व्यवस्थेचा बुरुज सर केला...!

भाषा, साहित्य व संस्कृती यांचा अन्योन्य संबंध आहे. भाषा नसती तर साहित्य... साहित्य-संस्कृती निर्माणच करता आली नसती. म्हणून साहित्य हा एक भाषिक व सांस्कृतिक उपक्रम आहे. भाषा ही समाजजीवनाचा एक प्रकारे मआरसाचफ असते...! जगण्याच्या लढाईचे भाषा हे साधन आहे, मानवी जीवन जगत असताना माणूस जातीशी, जात व्यवसायाशी व व्यवसाय भापेशी घट्ट बांधलेला असतो. त्याप्रमाणे ममराठवाडी बोलीफअस्तित्वात आली. निजामकाळापासून ती आजतागायत अनेक साहित्यिकांनी ममराठवाडी बोलीफ जिवंत व समृद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी अलीकडचे सक्षम उदाहरण द्यायचं असेल तर प्रा. राजपाल पाटील लिखित महिरकणीफ या दीर्घ पण लाघवी कादंबरीचं...!

मराठवाडा हा एक विशिष्ट भूप्रदेश असला तरी तो कोकणासारखा ठळक प्रदेश नाही. ममराठवाडा बोलीफ ही एक मराठी बोली होऊ शकते. ही प्रा. राजपाल पाटील यांनी महिरकणीफ या संवेदनाशील कादंबरीत दाखवून दिलं आहे. पण ममराठवाडा बोलीफचा स्वतंत्र कोश नाही. मराठवाडा हा खेड्यांचा व कोरडवाहू शेतीचा प्रदेश आहे. या मराठवाड्यात अजूनही व्यावसायिकता रुजली नाही. सर्व काही प्रत्यय येतो महिरकणीफ च्या प्रत्येक पानावर...! मराठवाडा हा प्रदेश अत्यंत उदार, रांगडा, सोशिक, साधा, सरळमार्गी, भोळा व सुस्त आहे. त्यासाठी प्रा. पाटील यांनी श्रीमंत, म्हादूमामा, रत्नामावशी, मदन, व्यंकटराव जाधव व त्यांची पत्नी... अशा व्यक्तीरेखा हुबेहूब उभ्या केलेल्या आहेत. या सहृदयी व्यक्तिरेखा उभ्या करताना मराठवाडी बाणा अगदी अलगदपणे जपलेला आहे. तो कोणालाही सहज आवडेल.

प्रा. पाटील यांनी श्रीमंत व भोसले साहेव या प्रतिनिधिक पात्राद्वारे मराठवाड्यातील लोकजीवन रंगेल, विलासी, स्वागतशील असले तरीही वागण्यात सरंजामी, आडमुठेपणा व विशिष्ट जातीचा अहंमगंड असली तरी मआंधळीफ जातीयता अजिबात नाही. आर्थिक मागासलेपणा असला तरीही प्रतिष्ठेसाठी तो कर्जबाजारी होण्यात कमीपणा मानत नाही. इथल्या राजकीय व्यवस्थेचा बळी ठरलेला मश्रीमंत ने आपल्या पत्नीला मरेपर्यंत शेतात काम करू दिले नाही. ङ्गपाटलाच्या बायांनी घराबाहेर पडून शेतात काम करायचं नसतं...ङ्ख हा रिवाज... हा आडमुठेपणा... पाटीलकीचा खोटा अहंमगंड व सर्वातून आलेल्या नैराश्येमुळे... दारूच्या व्यसनामुळे अखेर बासाळतो...! असे ठसठशीत घेतात व समाजाला आत्म घेऊन जातात.



स्वातंत्र्यानंतर कुटुंबव्यवस्थाही बदलत गेली. कुटुंब नात्याच्या जात्यात पात्र असलेल्या ममनोरमाफ नणंद- भावजय, आई- सहसंबंधाने निर्माण झालेले संवेदनशील मनाने सांभाळले. करणारी हृदयद्रावक कादंबरी म्हणून म्हणावसं वाटतं...

काय म्हणावं लावंल; देवा ! नात्यामधील आजही खेड्याची संस्कृती काहीच किंमत देत नाही.

श्रीमंतच्या ममनाचाफ बुरूज प्रसंग वाचकाच्या मनाचा ठाव चिंतनाकडे अगदी सहजपणे

राजकारण, अर्थकारणांबरोबरच महिरकणीफ्फकादंबरीतील संयुक्त कधीच भरडलं नाही. प्रमुख या पात्राने पती, सासू-सासरे, वडील, बहिण-भाऊ तसेच बेनामी नाते... यांना हळुवार व सर्व नात्यांची हळुवार गुंफ्फण म्हणजे महिरकणीफ होय.

नात्याला, नातं कशाला माणूस केव्हा तुव्ह मावंल..! मुलीच्या आशा-आकांक्षांना कारण....

झाली उपवर लेक, माय झुरते मनाशी, दडे सावलीच जशी, उन्हामंदी झाडापाशी...

या डॉ. जगदीश कदमच्या ओळीप्रमाणे आई-वडिलांना पसंत पडलेल्या मुलाच्या गळ्यात माळ घालणे... मूल जन्माला घालणे व त्याचा मसंसारफ सांभाळणे... अशा माफ्फक अपेक्षेनुसार ममनोरमाफ नावाच्या अशा अनेक मुलींचे लग्न होतात. मग तेव्हा मश्रीमंतफ नावाच्या मुलांचा संसार सुरू होतो. राजकीय लोकांच्या खांद्यावर पडलेल्या महातानेफ शेफ्फारून जाऊन पक्षाच्या दावणीला मकार्यकर्तेफ या गोंडस नावाने समाजात मिरवू लागतात. त्या पाटीलकीचा मतुराफ डोक्यात शिरलेला असतो. जमीन-जायदाद खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी कवडी मोलात विकली जाते. हाती पैसा आला की शौक ठेवू लागतात. धाब्यावरचे चटकदार जेवण व दारूच्या रंगीविरंगी फ्फेसात कार्यकर्त्यासोबत रमणे... यालाच मराजकारणफ म्हणून राजकीय लोकांचे ताटाखालचे मांजरं बनून लाचारी जीवन जगायचं. कर्जबाजारी बनून वैफ्फल्यग्रस्त व नैराश्यमय जीवनाला मआत्महत्याफ करून संपवणाऱ्या आधुनिक तरुण शेतकऱ्याची मनोवस्था महिरकणीफ कादंबरीत प्रकर्षाने जाणवते. हे जाणवणं वाचकाला हेलावून सोडते. या ठिकाणी प्रा. पाटील यांचं कसब पणाला लागलं आहे. ते खरोखरच कौतुकास्पद देखील आहे.

श्रीमंत ही व्यक्तिरेखा आरंभशूर नवतरुणाचं... श्रमप्रतिष्ठा जतन न करणाऱ्या तरुणाचं प्रतिनिधित्व करते. सगळ्या काम ात अपयश पदरी पडणं हे मआरंभशूरफ व्यक्तीच्या पाचवीला पूजलेलं असतं. अपयश हा शिक्षक असतो, अपयश हा चुकलेला मार्ग असतो, अपयश हे रस्त्याचा शेवट नाही...! अशा बाबी आत्महत्या करणाऱ्या युवकांना कळत नाहीत.

घरात नाही दाणा अन बाजीराव म्हणा...! अशा तोऱ्यात वावरलेल्या घराण्याची सून विधवा बनते. श्रीमंत जेव्हा फ्फाशी घेतो तेव्हा फ्फासाचं एक टोक त्याच्या गळ्यात तर दुसऱ्या टोकाला त्याचे आई-वडील, सून मनोरमा व तिचे दोन लेकरं होती. मनोरमा दुःखात रममाण न होता तिला जबाबदारी समजू लागली, जबाबदारीची जाणीव होऊ लागल्याने घरकर्त्याचा ममनोधर्मफ ती पाळू लागली. मार्टिन ल्युथरने सागितल्याप्रमाणे ङ्गस्त्रिया या पुरूषांपेक्षा जास्त सदिच्छेने धर्म पाळतात...!ङ्ख तसा कर्तव्याचा मधर्मफ मनोरमाने श्रमाची नक्षी देवून पाळला. स्वतः शेतात राब राब राबून प्रथम कुटुंबाचं कर्ज फ्फेडून आर्थिक घडी बसविली. बचत गटाच्या माध्यमातून महिला बँक स्थापन करून स्वतःबरोबर इतर महिलांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. विधवा महिलांचं जीवन तुटलेल्या पतंगासारखं असतं! अडकलेल्या पतंगासारखं असतं...! अडकलेला पतंग आधी काढायला बघतात. निघत नाही म्हटल्यावर फ्फाडायला निघतात. निराधाराचं असंच असतं. तसाच प्रकार ममनोरमाफ या विधवा व्यक्तिरेखासोबत घडला. विधवा मनोरमा आपला दीर ममदनफ ला सोबत घेऊन जीवनाच्या आर्थिक विवंचनेचे अनेक मबुरूजफ सर करीत असताना नावारूपाला येण्याचा प्रयत्न करीत होती. अशातच मनोरमा व अल्पावधीतच विधुर झालेल्या ममदनफ या व्यक्तिरेखांच्या चारित्र्यावर अनैतिक संबंधाचे शिंतोडे समाजाकडून उडू लागले, तेव्हा न डगमगता लोकभावनेला बळी न पडता आपल्या लहान बहिणीचे लग्न मदनसोबत लावून देते.

वेदनांचा वेद झाला, यातनांचा यज्ञ रे ! तिने कधी येवू दिला नाही पापणीला पूर रे...!

अशा या जिगरबाज, बहादुर, रणरागिनी व संवेदनशील जबाबदार नारीचे प्रखरपणे प्रतिनिधित्व करणारी महिरकणीफही कादंबरी मराठी साहित्यातील प्रतिभेला फ्फुटलेले मपंखफ आहे. अशा दणकट पंखाने प्रा. राजपाल पाटील मराठी साहित्याच्या आकाशात मुक्तपणे भरारी घेत आहेत. पाटील सरांच्या प्रतिभाशक्तीला बळ मिळो.

ना थककर बैठ, उड्डाण अभी बाकी है; जमीं खत्म हुई तो क्या हुआ आसमाँ अभी बाकी है...!

असं झगडत-झगडत अखेर मनोरमा महाराष्ट्र शासनाच्या महिरकणीफ पुरस्काराची मानकरी ठरते. पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या व्यासपीठावरून मनोरमाचे झालेले भाषण अंतकरणाचा ठाव घेते... प्रत्येकाला आत्मचिंतन व आत्मपरीक्षण करायला भाग पाडते. मनोरमेचे भाषण हे भाषण नसून बिघडलेल्या समाजव्यवस्थेला व राजकारणाला लावलेली एक चपराक आहे...! समाजातला प्रत्येक घटकाला अंतर्मुख करायला लावणार व चुकीच्या धारणांची व धोरणाची चिरफ्फाड करणारं हे भाषण नसून अंजन घालणारं आहे, वायकांना अस्तित्वाच्या अनंत अडचणी येतात पण बायकांनाही विकट परिस्थितीशी लढता येतं. हे प्रा. राजपाल पाटील यांनी ममनोरमा मच्या माध्यमातून पटवून दिलं आहे. मनोरमाचं भाषण विकृत व विचित्र लोकभावनेला दिलेला उत्तमोत्तम संदेश आहे.

बहुतांश साहित्यप्रकारात समस्यांचे दुःखांचे वर्णनावरच भर दिला जातो, समस्यानिराकरण वा दुःखहरणावर भर दिलेला नसतो. पण पाटील सरांची कादंबरी संयुक्त कुटुंबात येणाऱ्या अडचणीवर कशी मात करायची... श्रमप्रतिष्ठा कशी जतन करायची... संवेदनशील नात्यांना कसं सांभाळायचं... बेरोजगारीवर कशी मात करायची... कोणत्याही राजकीय नेत्यांच्या मागे न लागता विकास कसा करायचा... सामाजिक व सांस्कृतिक उत्सव साधेपणाने कसे व का साजरे करायचे... अडाणी सासू-सासऱ्यालाही आई-वडिलांसारखे सांभाळून सुखी संसार कसा करता येतो... नातेसंबंध मोह-मायेने टिकत नसतात तर बांधिलकीमुळे कसे टिकतात... बांधीलकीमुळे नैतिक चारित्र्यालाही बळकटपणा कसा येतो... आणि एखादे मत व्यासपीठावरून मांडले म्हणजे त्याला खरा अर्थ प्राप्त होतो कसा... या सर्वांवर पर्याय देणारी कादंबरी आहे...! या सर्वांवर इलाज करणारी कादंबरी आहे...! अशा या पर्याय देणाऱ्या कादंबरीकाराला मराठमोळा मानाचा मुजरा...!

प्रा. राजपाल पाटील यांची लेखनशैली लाघवी, ओघवती पण स्वतंत्र वाण्याची आहे. ग्रामीण जीवन व कृषीप्रधान कुटुंबे कसे राजकारण व निवडणुकीतील छक्के-पंजे-धोरणे... या सर्वांचे सुक्ष्म निरीक्षणे ही प्रा. पाटील सरांची जमेची बाजू आहे. शेती, शेतीशी निगडित सर्व कामे, शेतीशी निगडित अवजारे व कौशल्ये, शेतीशी निगडित मनुष्यबळ व योजना यांचा उल्लेख करताना संबंधित मराठी शब्दांचा समर्पक वापर केलेला आहे. अडगळीत पडत असलेल्या शेतीविषयक शब्दांना कादंबरीत आणून मराठी भाषा समृद्ध करणारी धडपड कौतुकास्पदच आहे. अशा या प्रा. पाटील सरांच्या धडपडीला एक वाचक म्हणून सलाम करतो आणि पुढील लेखनाला सुधारणेचे व प्रतिभेचे पंख फुटो अशा हार्दिक शुभेच्छा....!

वाचक बिरादार तुळशिदास लोहारा
ता. उदगीर मो. ७२१८३५८०७४











### उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# दयानंद कला महाविद्यालयात एम ए लोकप्रशासन द्वितीयच्या विद्यार्थ्यांना निरोप

लातूर / प्रतिनिधी- दयानंद कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने एम ए लोकप्रशासन द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. रामेश्वर खंदारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना लोकप्रशासन विषयातील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध असून त्यांनी त्या संधीचा उपयोग करून आपल्या जीवनामध्ये यश संपादन करावे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात एम ए प्रथम वर्षातून प्रथम आलेली विद्यार्थिनी सरोजा लोळे व संसदीय राष्ट्रकुल अभ्यास मंडळ नागपूर येथे हिवाळी अधिवेशनासाठी सहभागी झालेली विद्यार्थिनी श्रद्धा तिकोटकर या दोन विद्यार्थिनीचा पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्थेने यापूर्वीच शिष्यवृत्ती देऊन गौरविले आहे.

याप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, लातूर येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेले प्रा. वसंत बिराजदार हे पालक विशेष प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी मनोगतपर मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासाबरोबरच इतर व्यक्तिमत्व घडवणाऱ्या पुस्तकांचं वाचन करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवाव्यात आणि त्याचा उपयोग भविष्यकालीन जीवनात करावा असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी दयानंद कला महाविद्यालयातून शिक्षण घेऊन जाणारा विद्यार्थी हा सामाजिक जाणिवेतून संस्कार आणि सर्वांगिण विकासात निर्माण होणारा विद्यार्थी असल्यामुळे तो समाजाला एक नवीन दिशा देण्यासाठी प्रयत्नशील असतो. असे मत मांडले आणि विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या! तसेच डॉ. उर्मिला रेड्डी यांनी करियर विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी एम ए द्वितीय वर्षातील सरोजा लोळे, श्रद्धा तीकोटकर आणि एम ए प्रथम वर्षातील प्रवीण लाळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन दीपिका यादव आणि राहुल कांबळे या विद्यार्थ्यांनी केले तर आभार ऋषिकेश पवार या विद्यार्थ्यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, लोकप्रशासन विभागातील प्रा. डॉ उर्मिला रेड्डी, डॉ. शिवशंकर कसबे, प्रा. अश्विनी धायगुडे, प्रा. स्फूर्ती समुद्रे, प्रा. सुमित्रा तांभाळे, प्रा. चैतन्य शिंदे,



तसेच विद्यार्थी उपस्थित होते आणि या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजेच एम ए प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे, प्राचार्य प्राध्यापक व एम ए द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुस्तक देऊन स्वागत केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लोकप्रशासन प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# गांजूर येथे चौथे शिवार साहित्य संमेलन

लातूर:- मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूर व हरिविठ्ठल प्रतिष्ठान,गांजूर यांच्या वतीने चौथे शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन रविवार दि.१४ एप्रिल २०२४ रोजी करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार, गझलकार मा.जयप्रकाश दगडे आहेत. लातूर मधील सामाजिक, सांस्कृतिक विचारपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यम संस्थेचे श्री. जयप्रकाश दगडे अध्यक्ष आहेत. माध्यम हे सामाजिक प्रबोधनाचा वसा घेऊन अनेक लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करणारे विचारपीठ आहे. मुलाखत, गप्पा, गायन, संगीत रजनी,चर्चासत्रे,लोकप्रबोधन, आरोग्य निदान, सेवा आणि प्रबोधन व्याख्यानांचे आयोजन त्यांनी आत्तापर्यंत केले आहे. श्री जयप्रकाश दगडे यांच्या निमित्ताने कवी व गझलकार आणि सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान असणारे उद्घाटक लाभले आहेत.

संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी भारत सातपुते, प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ कथा, कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ कुसूमताई मोरे, आयोजक डॉ.संग्राम मोरे यांची उपस्थिती पहिल्या सत्रात आहे.

दुसरे सत्रात बदलते खेडे आणि मराठी साहित्य या परिसंवादाचे अध्यक्ष राजकीय विश्र्लेषक डॉ.संग्राम मोरे तर अनंत देशपांडे,माधवराव मल्लीशे, नरसिंग इंगळे व डॉ. ज्ञानदेव राऊत यांचा सहभाग आहे.दुपारी जेवणानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व नारी प्रबोधन मंचच्या अध्यक्षा श्रीमती सुमती जगताप यांची डॉ.नयन राजमाने मुलाखत घेणार आहेत.

निमंत्रितांचे कवी संमेलन दुपारी तीन तीस वाजता आहे. कवी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी व गीतकार श्री योगीराज माने असणार आहेत. शैलजा कारंडे, गोविंद जाधव कवी संमेलनाचे सूत्रसंचालन करणार आहेत. रमेश चिल्ले, नरसिंग इंगळे राजेसाहेब कदम प्रकाश घादगिने, नरसिंह भिकाने, सुरेश गीरसागर,सुलोचना मुळे, संजय घाडगे, अनंत कदम, हाशम पटेल, विमल मुदाळे, रामदास कांबळे, ज्ञानेश्र्वर हंडरगुळीकर, देवदत्त मुंडे, जोश लातूरी,नितीन गायकवाड, बालाजी मुंडे, अनिल चवळे, वृषाली पाटील, नयन राजमाने,क्रांती मोरे, उषा भोसले,राजेंद्र माळी, रमेश हाणमंते, नामदेव कोद्रे, दिलीप लोभे, विशाल अंधारे,हानमंत पवार, संदीप चव्हाण, दयानंद बिराजदार, शीला कुलकर्णी, निलेश नागरगोजे, विश्र्वंभर इंगोले, उर्मिला भालके, जना घुले, वंदना केंद्रे, सुलक्षणा सरवदे, सुनीता मोरे,तहसीन सय्यद, सविता धर्माधिकारी, रजनी गिरवलकर, नीलिमा देशमुख, अमृता पत्की, मीना घुले, स्वाती जोशी, संभाजी नरहरे,प्रदीप हंगरगेकर आणि बालाजी भंडारे यांची उपस्थिती आहे.

सायंकाळी पाच वाजता संमेलनाचा समारोप होणार आहे. या समारोप सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्राचे लेखक प्रभावी अभ्यासक डॉ भूषणकुमार जोरगुलवार हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष कवी भारत सातपुते, स्वागताध्यक्ष डॉ. कुसुमताई मोरे,डॉ. शेषराव मोहिते, आयोजक डॉ.संग्राम मोरे, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, सचिव डॉ. दुष्यंत कटारे आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे सन्माननीय सदस्य सुनिता आरळीकर, विवेक सौताडेकर,नरसिंग इंगळे,प्रकाश घादगिने, शैलजा कारंडे,नयन राजेमाने,डॉ. ज्ञानदेव राऊत यांची उपस्थिती असणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील साहित्यिक, रसिक वाचक मंडळींनी या संमेलनाला उपस्थिती दाखवून कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन या संमेलनाचे आयोजक डॉ. संग्राम मोरे, जयद्रथ जाधव, डॉ. दुष्यंत कटारे आणि सर्व कार्यकारिणी केले आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सलग १८ तास अभ्यास

लातूर : ता. १३: येथील दयानंद वाणिज्य महाविदयालय ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती एकच ध्यास १८ तास अभ्यास हा नावीन्यपूर्ण प्रेरक उपक्रम घेवून शनिवारी ता.१३ रोजी साजरी करण्यात आली. या उपक्रमामध्ये ११४ विद्यार्थी व प्राध्यापीका सुनिता नागरगोजे यांनी सहभाग घेतला होता. पहाटे ५.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत सलग अभ्यासिकेमध्ये बसून विदयार्थ्यांनी अभ्यास केला. प्रारंभी प्राचार्य डॉ. आर.एस.पवार यांचे हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. आर. एस. पवार म्हणाले, मविद्यार्थांनी महामानवाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन मार्गक्रमण करावे. प्रत्येकजण आपापल्यापरीने बाबासाहेबाना अभिवादन करीत असतो. परंतु १८ तास अभ्यास करून मानवंदना देणे हि कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

# बळीचं राज्य पुन्हा यावे यासाठी सर्वांनी जागरुक रहावे

## भागवताचार्य हभप व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर



लातूर/प्रतिनिधी ; देशात पुन्हा बळीचं राज्य यावे यासाठी सर्व नागरिकांनी जागरुक रहावे असे आवाहन भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांनी आज लातूर तालुक्यातील हरंगुळ बु येथील कैलास नगर येथे सुरू असलेल्या श्रीमद्भागवत कथा अमृतपान ज्ञानयज्ञ सोहळ्याला ते संबोधित करत होते.

श्रीमद्भागवत कथेचा आज शनिवार दि. १३ एप्रिल रोजी पाचव्या दिवशीच्या प्रसंगी विष्णू अवताराचे अख्यान सांगताना त्यांनी वामन अवतारातील दानशूर व कष्टाळू बळीराजा प्रमाणे आता ही राज्य यावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी प्रामाणिकपणे कष्ट आणि दया भाव जोपासून समाजातील दुर्बल व दुर्लक्षित घटकांना प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

यावेळी भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांच्यासह गायनाचार्य शाम मोरे, सिंथवादक महादेव मस्के, पखवाजवादक कल्याण पवार गुरुजीसह कैलास नगर, गोविंद नगर, सदाशिव नगर सह हरंगुळ बु. परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# दलित कामगारास अमानुष मारहाण प्रकरणी डॉ घुगेनां कोर्टात हजर राहण्याचे आदेश

लातूर:- लातूरचे डॉ प्रमोद घुगे यांनी मातंग समाजातील लिफ्ट कामगाराला पैश्याच्या कारणावरून अपहरण करून, पार्श्वभागात मिरची पावडर टाकून अमानुषपणे मारहाण केली म्हणून लातूर एम आय डी सि पोलीस स्टेशन येथे दि. ३० मार्च रोजी गुन्हा नोंद झाला आहे.

गुन्हा नोंद होऊन बरेच दिवस झाले आहेत. या प्रकरणी काही आरोपीना अटक झाली परंतु मुख्य आरोपी डॉ घुगे याला अद्याप अटक नाही आरोपी डॉक्टरने अटकपूर्व जमीनसाठी कोर्टात अर्ज केला आहे. यावर शुक्रवारी सुनावणी होणार होती परंतु आरोपीचे वकिलांनी सोमवार पर्यंत मुदत वाढवून घेतली. यावेळी तक्रारकर्ते आनंद कोटंबे यांचे बाजूने सहाय्यक सरकारी अभियोक्ता लुक्ष्मण शिंदे आणि पिडीतचे खाजगी वकील अँड निलेश करमुडी, अँड अभय पाटिल यांनी सदर प्रकरणी बाजू मांडताना मा. न्यायालायला सांगितले कि सदर प्रकरण फार गंभीर आहे अटकपूर्व जमीनच्या सुनावणीच्या वेळी आरोपी हा मा. न्यायालयात हजर असावा अशी विनंती केली असता न्यायालयाने आरोपीला सोमवारी हजर करण्याचे आदेश आरोपीच्या वकीलाला दिले. अशी माहिती तक्रारकर्ते तथा पिडीतचे खाजगी वकिल अँड निलेश करमुडी, अँड अभय पाटिल यांनी दिली.

## मुंबईच्या बीकेसीतील सरकारी कार्यालयाला भीषण आग

मुंबई : मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात भीषण आगीची घटना घडली आहे. बीकेसी परिसरात असलेल्या सरकारी कार्यालयातील निवृत्ती वेतन विभागाच्या कार्यालयाला चौथ्या आणि पाचव्या मजल्यावर ही लाग लागली. आगीचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. कार्यालयातील अग्निशमन यंत्रणा कार्यन्वयीत केल्यानंतर देखील आग विझत नसल्याने अग्निशमन विभागाला कळवण्यात आलं. अग्निशमन दलाचे चार बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत. मुंबई पोलीस देखील घटनास्थळी उपस्थित आहेत. आग विझवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्य सलग आठरा तास वाचन उपक्रम संपन्न

देगलूर(प्रतिनीधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व श्री समर्थ वाचनालय, देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने एम ओ यू अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सलग १८ तास वाचन या उपक्रमाचे आयोजन देगलूर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात करण्यात आले.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री सुर्यकांत नारलावार होते. प्रमुख पाहुणे समर्थ वाचनाएलयाचे सचिव अविनाश देसाई



हसनाळकर व कोषाध्यक्ष देवेंद्र मोतेवार तसेच देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, डॉ. बालाजी कत्तुरवार, ग्रंथपाल, डॉ. साईनाथ शिंदे, सहायक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक, समर्थ वाचनालयाचे ग्रंथपाल पुंडलिक कदम, दीपक संगमकर, बालाजी गोविंदवार, ईळेगावकर रेखा व महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून मतदानाची शपथ देण्यात आली.

दिनांक १२/०४/२०२४ रोजी सकाळी ०५:०० पासून रात्री ११:०० वा. पर्यन्त विद्यार्थ्यांनी सलग १८ तास वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या उपक्रमात एकूण ५३ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.


**CHANGE IN NAME**

I have change my name from SANJEEV BALWANTRAO PANDE To SANJAY BALWANTRAO PANDE Hence for this declaration in future.
OLD NAME: SANJEEV BALWANTRAO PANDE
NEW NAME: SANJAY BALWANTRAO PANDE
In future the same name will be used by my spouse and children

**ADDRESS**
SHREE R 5 1 124, AUSA ROAD, OPP HOTEL VISHWAMITRA, LATUR, 413531,
MAHARASHTRA
Mobile No: 9423078567


## पान १ वरून

### बाबासाहेब...

अलायन्सवाले खोटे बोलत असतात. ही त्यांची फॅशन झाली. ज्या काँग्रेसने बाबासाहेबांना निवडणुकीत पराभूत केले, ज्यांनी बाबासाहेबांना भारतरत्न दिले नाही, ज्यांनी देशात आणिबाणी लागू करून संविधान संपवण्याचे काम केले, आज ते मोदींना शिव्याशाप देण्यासाठी संविधानाच्या नावाने खोटे बोलत आहेत. मीच देशात पहिल्यांदा संविधान दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. काँग्रेसने तर संविधान दिनालाही विरोध केला होता. हा बाबासाहेब आणि त्यांच्या संविधानाचा अपमान नव्हता काय? आम्ही बाबासाहेबांशी संबंधित पाच तिर्थस्थळांचा विकास केला. त्यामुळे काँग्रेस आणि इंडिया अलायन्सच्या थापेबाजीपासून सावध राहा असे आवाहन पंतप्रधानांनी केले.

### तिहारमध्ये...

भेटणं सामान्य बाब आहे. अरविंद केजरीवाल यांना अमानुष वागणूक दिली जात आहे. भ्याड गुन्हेगारांनाही त्यांच्या कुटुंबियांना भेटण्याची परवानगी आहे. तर दिल्लीचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या केजरीवाल यांच्या पत्नीला आणि पीएला खिडकीतून भेटायला लावले जात आहे असे अमानुष वर्तन का? असा सवाल संजय सिंह यांनी केला. हे कृत्य केवळ मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अपमानित करण्यासाठी आणि निराश करण्यासाठी केले जात आहे. आजचा लढा लोकशाही आणि संविधान वाचवण्याचा असल्याचेही ते म्हणाले.

भेट रद्द केल्याचा आरोप

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि दिल्लीचे खासदार अरविंद केजरीवाल यांची भेट तिहार तुरुंग प्रशासनाने शेवटच्या क्षणी रद्द केल्याचा आरोप आप नेत्याने केला. यामागे सुरक्षेचे कारण सांगण्यात आले. आम्हाला सांगण्यात आले आहे की पंजाबचे मुख्यमंत्री आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना खिडकीच्या चौकटीतून भेटावे लागेल. तुम्ही दिल्लीचे मुख्यमंत्री, पंजाबचे मुख्यमंत्री यांचा अपमान करत आहात, अरिंवद केजरीवाल यांना तोडण्याचा प्रयत्न करत आहात. माझी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांसोबतची बैठक रद्द करण्यात आली आहे असेही ते म्हणाले.

### जातीय जनगणना...

उपलब्ध व्हावा, यासाठी इंडिया आघाडी सत्तेत आल्यास ठोस पावले उचलणार आहोत. त्यासाठी ङ्गप्रशिक्षणार्थी असण्याचा हक्कफ प्रदान करणारा कायदा संसदेत मंजूर केला जाईल.

राहुल गांधी यांनी म्हटले की, पुन्हा सत्तेवर आल्यास राज्यघटना बदलण्याचा भाजपचा डाव आहे. याआधी भारताकडे आदर्श लोकशाही राष्ट्र म्हणून सारे जग पाहात होते. मात्र, आता भारतामध्ये लोकशाहीला अर्थ उरलेला नाही, असे जगाचे मत बनले आहे. आर्थिक स्रोत व माध्यमांसह सर्व गोष्टींवर आपली मक्तेदारी निर्माण करण्याचे मोदी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. देशात सध्या दोन विचारसरणींमध्ये संघर्ष सुरू आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

### मराठवाड्यात...

मुलगा गंभीररित्या भाजला आहे. त्याच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे दोघेजण शेतामध्ये काम करत असताना अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली आणि हा अपघात घडला.

परभणी वीज कोसळल्याने दोघांचा मृत्यू

परभणी जिल्ह्यात काल सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसात वीज पडून दोघांचा मृत्यू झाला, तर ६ जनावरांचा देखील मृत्यू झाला आहे. तसेच अनेक ठिकाणी आंबा फळबागांसह भाजीपाल्याचे नुकसानही झाले आहे. वीज पडून गंगाखेड तालुक्यातील ईळेगाव येथील ५५ वर्षीय बाबुराव शेळके या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तर, सोबत असणाऱ्या दोन महिला सुदैवाने बचावल्या आहेत. तसेच, सोनपेठ तालुक्यातील भाऊंचा तांडा येथील हरिबाई सुरनर यांचाही वीज पडून मृत्यू झाला.

### शरद पवार...

लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक होते. मात्र चौधरी यांना उमेदवारी न देता ऐनवेळी पक्षात आलेले श्रीराम पाटील यांना उमेदवारी दिल्याने भुसावळ, वरणगाव, रावेर, यावल या तालुक्यातील शेकडो पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. यामुळे रावेरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. चौधरी यांना उमेदवारी न मिळाल्याने ते नाराज आहेत. त्यामुळे ते अपक्ष उमेदवारी दाखल करून बंडखोरी करण्याचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे. आता संतोष चौधरी नेमका काय निर्णय घेणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### महायुतीच्या...

प्रत्येक समाजासाठी कोट्यावधीचा निधी विकास कामांना मिळून दिला, त्याचबरोबर वैयक्तिक लाभाच्या योजनांचा मोठ्या प्रमाणात अनेकांना लाभ दिला असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून काँग्रेसच्या ताब्यात आहे गेल्या पंधरा वर्षात काय विकास केला. कोणती सामाजिक आणि विकासाची कामे झाली आणि गेल्या तीन वर्षात आपण गावा गावात किती लाखाचा निधी दिला, कोणती कामे आपल्यामुळे झाली आणि होत आहेत याची मतदारात चर्चा कार्यकर्त्यांनी घडवून आणावी आणि भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

या बैठकीत बोलताना नवनाथ भोसले यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबानंतर मतदार संघात आ. रमेशआप्पा कराड यांच्याच माध्यमातून विकास कामासाठी निधी मिळाला असल्याचे सांगून जात, धर्म, आपला, जवळचा, दूरचा असा भेदभाव केला नसल्याचे बोलून दाखविले तर राष्ट्रवादीचे अजित शिंदे यांनी देश हितासाठी नरेंद्रजी मोदी साहेबांसोबत जाण्याचा निर्णय अजित दादा पवार साहेबांनी घेतला. दादाच्या सूचनेनुसार राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते जिद्दीने काम करून सुधाकर शृंगारे यांच्या विजयात खारीचा वाटा उचलतील यात शंका नाही असे बोलून दाखवले. शिवसेनेचे कुलदीप सूर्यवंशी यांनी विकास कशाला म्हणतात हे आ. रमेशआप्पा कराड साहेबांनी कृतीतून दाखवून दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार खांद्याला खांदा लावून आणि जी जबाबदारी द्याल ती शिवसेना पार पडेल असे बोलून दाखवले. जिकडे आठवले तिकडे सत्ता हे समीकरण सिद्ध झाले असून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना मताधिक्य वाढविण्यासाठी रिपाईचे कार्यकर्ते मोठ्या जिद्दीने काम करतील असा विश्वास विजयकुमार गायकवाड यांनी व्यक्त केला.

या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद आंबेकर, रिपाईचे धम्मानंद घोडके, अल्पसंख्याक आघाडीचे रशीद पठाण, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी आभार व्यक्त केले. या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपाई यासह मित्र पक्षातील महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काँग्रेस...

एकही आमदार पक्ष सोडणार नाही. दरम्यान, सिद्धरामय्या यांनी आपल्या नेतृत्वाखाली काँग्रेस पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करेल, असा विश्र्वास व्यक्त केला आहे. दुसरीकडे, सिद्धरामय्या यांच्या आरोपांना उत्तर देताना भाजपा खासदार एस प्रकाश म्हणाले की, समाजातील एका वर्गाची सहानुभूती मिळवण्यासाठी ते वारंवार असे आरोप करत आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आहे. याचबरोबर, कर्नाटकातील सिद्धरामय्या यांच्या काँग्रेस नेतृत्वाखालील सरकारचे प्रमुख मुद्दे आणि उपलब्धी यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी मुख्यमंत्री खोटे आरोप करत आहेत. तसेच, लोकसभा निवडणुकीत कर्नाटकात २८ जागा जिंकण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, सिद्धरामय्या केवळ निवडणुकीनंतर आपला पाय रोवण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत, असेही भाजपा खासदार एस प्रकाश म्हणाले.


**CHANGE IN NAME**

I have change my name from JAISHREE SANJEEV PANDE To JAYASHRI SANJAY PANDE
Hence for this declaration in future.
**OLD NAME:** JAISHREE SANJEEV PANDE
**NEW NAME:** JAYASHRI SANJAY PANDE
In future the same name will be used by my spouse and children

**ADDRESS**
SHREE BUILDING, AUSA ROAD, DESHPANDE COLONY, LATUR, 413531,
MAHARASHTRA
Mobile No: 94230 78567

**CHANGE IN NAME**

I have change my name from PRASAD SANJAYRAO PANDE To PRASAD SANJAY PANDE
Hence for this declaration in future.
OLD NAME: PRASAD SANJAYRAO PANDE
NEW NAME: PRASAD SANJAY PANDE
In future the same name will be used by my spouse and children

**ADDRESS**
R 5 1 124 SHREE BANGLOE ,
AUSA ROAD, DESHPANDE COLONY , OPP VISHWAMITRA HOTEL, LATUR,413512,
MAHARASHTRA.
Mobile No: 94230 78567

**दुकान भाडयाने देणे आहे**

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८




# उदगीर विधानसभा मतदारसंघातून काळगे यांना सर्वाधिक मताधिक्य - निवृत्ती सांगवे



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर विधानसभा मतदारसंघ हा समाजवादी विचारांचा बालेकिल्ला आहे. मध्यंतरीच्या काळात मोदी लाटेमुळे भाजपने या ठिकाणी पाय रोवले होते, मात्र गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत २२ हजाराच्या मताधिक्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे उमेदवार संजय बनसोडे यांना विजयी केले. आणि उदगीर हा समाजवादी विचारांच्या लोकप्रतिनिधींना प्राधान्य देतो, हे दाखवून दिले. येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी उदगीर विधानसभा मतदारसंघातून मोठे मताधिक्य मिळेल. असा विश्वास राष्ट्रीय दलित अधिकार मंचचे प्रदेशाध्यक्ष निवृत्तीराव सांगवे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रीय दलित अधिकारमंचच्या कार्यालयास भेट देण्यासाठी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, मांजरा सहकारी कारखान्याचे संचालक तथा उदगीर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक रवी काळे, काँग्रेस पक्षाचे जळकोट तालुकाध्यक्ष मारुती पांडे, राम स्वामी, बालाजी साळुंके, हुडगे आप्पा, राष्ट्रीय दलित अधिकार मंचच्या सल्लागार विधिज्ञ रुक्मिणीताई सोनकांबळे, बागवान बिरादरीचे प्रमुख समदभाई बागवान, संभाजी तिकटे, बंजारा युवा आघाडीचे नेते सुनील चव्हाण, अयाज जहागीरदार, मुकरम जागीरदार, राष्ट्रीय दलित अधिकार मंचाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बंटी घोरपडे, मुन्ना मदारी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना सांगवे म्हणाले की, डॉ. शिवाजीराव काळगे यांना ग्रामीण भागातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे सुखदुःख चांगल्या पद्धतीने माहिती आहेत. वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून गेल्या दोन तपा पेक्षा जास्त काळ ते जनतेची सेवा करत आहेत. स्वतः ग्रामीण भागातून असल्यामुळे त्यांना ग्रामीण जनतेची, त्यांच्या प्रश्नांची माहिती आहे. लोक कितीही मोठमोठे आश्वासन देत असले तरी प्रत्यक्षात लोकांचे अश्रू पुसण्यासाठी सदैव तत्पर असणारे उमेदवार लोकांना हवे असतात, योगायोगाने असाच उमेदवार काँग्रेस पक्षाने दिलेला असल्यामुळे त्यांना मोठ्या मताधिक्क्याने जनता विजयी करेल, असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला.

याप्रसंगी शिवाजी काळगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, मी कधीही लोकांना विसरणार नाही. समाजसेवेचा घेतलेला वसा कधीही टाकणार नाही, उदगीर ही उदागिर बाबाची आणि शाहमहम्मद कादरी यांच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेली वस्ती आहे. योग्य आणि अयोग्य ओळखण्याची क्षमता या भूमितील नागरिकात आहे. मी गोरगरिबांचा उमेदवार आहे. एका अर्थाने मी जनतेचा उमेदवार आहे. त्यामुळे जनता प्रचार यंत्रणा हातात घेईल. असा मला विश्वास आहे, असे सांगितले. प्रास्ताविक बंटी घोरपडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी स्पष्ट केले की, राष्ट्रीय दलित अधिकार मंच आणि दलित मुस्लिम ऐक्य संघ समाजवादी विचारांची पेरणी करणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे सर्वधर्मसमभावाची जाण असलेल्या उमेदवाराच्या पाठीमागे मोठी ताकद उभी केली जाईल. समाजातील जातीजातीमध्ये तेढ निर्माण करणे आणि धार्मिक वाद निर्माण करणे असे कृत्य करणाऱ्यांना लोक जागा दाखवतील. असा विश्वासही व्यक्त केला. आभार प्रदर्शन रवी जवळे यांनी केले.

# कुटूंबाप्रमाणे आपल्या नागरिकांची काळजी घेणारा खरा लोकनेता ना.संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** शहरातील बस आगारात एस.टी. चालक म्हणून कार्यरत असलेले बालाजी लामतुरे हे गावाकडे मोटरसायकल वरून जात असताना त्यांचा उदगीर तालुक्यातील करडखेलपाटी येथे अपघात झाला मात्र याच वेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे उदगीर मतदार संघाचा दौरा आटपून परत लातूरला त्यांच्या निवासस्थानी जात असताना त्यांना सदर अपघात झाल्याचे दिसून आले त्यांनी तात्काळ आपला ताफा थांबवुन अपघात स्थळी धाव घेवुन विचारपूस केली व यात लामतुरे यांचा अपघात झाला असल्याचे समजले. तात्काळ ना.बनसोडे यांनी त्यांची स्वतःची गाडी देऊन बालाजी लामतुरे यांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठवुन संबंधित डॉक्टरांना अपघात ग्रस्तांवर योग्य तो उपचार करण्याच्या सूचना दिल्या.

क्रीडा मंत्री संजय बनसोडे हे उदगीर मतदार संघातील जनतेची आपल्या कुटुंबाप्रमाणे काळजी घेतात. त्यांच्या कार्यतत्परतेने हजारो तरुणांची फळी त्यांच्या मागे असुन लहान - थोर मंडळीचे ते लाडके लोकप्रतिनिधी असल्याची प्रचिती वारंवार पहायला मिळते.

एका हाकेला धावुन जाणारे सर्वसामान्यांच्या अडचणीला धावुन जावुन मदत करणारे अतिशय हळव्या मनाचे नेते म्हणून ना.संजय बनसोडे यांची ओळख आहे. त्यांची कार्यकुशलता उदगीर मतदार संघातील विकासाचा डोंगर पाहुन दिसून येते. मतदार संघाचा सर्वांगीन विकास करणारे ते खऱ्या अर्थाने विकासरत्न व विकासपुरुष आहेत.

# कृषि महाविद्यालयाची कर्नाटक व तामिळनाडू राज्यांमध्ये शैक्षणिक सहल - अभ्यास दौरा संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत चालणाऱ्या उदगीर तालुक्यातील कृषि महाविद्यालय डोंगरशेळकी तांडा येथील बी.एस्सी. च्या कृषि पदवीच्या चौथ्या सत्रातील विद्यार्थी, विद्यार्थिनींची राज्यस्तरीय ( दक्षिण भारत ) शैक्षणिक सहल - अभ्यास दौरा , कर्नाटक व तामिळनाडू राज्यांमधील राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कृषि शिक्षण व संशोधन संस्थां बरोबरच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी देऊन , यशस्वीरित्या संपन्न झाली. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनाशक्तीला पुरेशी संधी उपलब्ध करून देणे, आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजविणे अशा उदात्त हेतुने, या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या शैक्षणिक सहलीमध्ये ७९ विद्यार्थी आणि ०६ प्राध्यापक, प्राध्यापिका सहभागी झाले होते.

या शैक्षणिक सहलीच्या प्रथम चरणामध्ये , बेगलुरू येथील कृषि विद्यापीठातील जैव तंत्रज्ञान प्रयोग शाळा, अनुवंशिकता आणि वनस्पती पैदासशास्त्र या विभागांना प्रत्यक्ष भेट दिली असता तेथील तज्ञ डॉ. शकुंतला व डॉ. पृथ्वीराज यांनी वनस्पती अनुवंशिकता शास्त्र व आधुनिक जैवतंत्रज्ञान याविषयी सविस्तर माहीती देऊन प्रयोगशाळा दाखवली . तसेच कृषि विस्तार शिक्षण प्रदर्शनालय, वनऔषधी उद्यान, लालबाग उद्यान, सर विश्वेश्वरैया औद्योगिक आणि तंत्रज्ञान संग्रहालय व एम. चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियम इत्यादी संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन उपस्थित तज्ज्ञांकडून माहिती संपादित केली.

सहलीच्या द्वितीय चरणामध्ये , मैसुर येथील केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्थेला भेट देऊन प्रगत व आधुनिक तंत्रज्ञानाची माहीती अवगत केली. मैसूर येथील राजवाडा, रेल्वे संग्रहालय, प्राणी संग्रहालय आदी ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या विषयी माहीत जाणून घेतली . तदनंतर , उटी येथील भारतीय मृदा आणि जल संवर्धन केंद्रास भेट दिली.तेथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. प्रसादकुमार यांनी मृदा आणि जल संवर्धनाचे प्रकल्प व तंत्रज्ञान याबाबत सखोल माहिती दिली. उटी येथील उद्यानविद्या संशोधन केंद्रातील तज्ञ डॉ. पि. राजा यांनी डोंगराळ भागातील फळोत्पादन, भाजीपाला व फुलपिकांचे क्षेत्रफळ, उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यासाठीचे विकसित तंत्रज्ञाना बद्दल मार्गदर्शन व माहिती दिली . डॉ. लावण्या पल्ली यांनी चहा लागवड तंत्रज्ञान, काढणी पश्चात प्रक्रीया व विक्री व्यवस्थापन याबाबत विस्तृत माहीती दिली. प्रसिद्ध टाटा चहा व चॉकलेट उद्योग समूह , गुलाब बाग, बोटॅनिकल गार्डन, उटी लेक व थंड हवेचे ठिकाण डोडाबेट्टा इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या , या सर्व स्थळांची विस्तृत माहीती विद्यार्थ्यांनी अवगत केली.

सदरील शैक्षणिक सहल, अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून सहलीत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींना कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योग व्यवसाय, विक्री व्यवस्थापण, उपलब्ध बाजारपेठा इत्यादी विविध कृषि क्षेत्रातील तांत्रिक मार्गदर्शन व माहिती प्राप्त झाली .

सदरहू शैक्षणिक सहल नंदिग्राम कृषि एवंम ग्राम विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ संग्रामजी पटवारी, सचिव गंगाधरराव दापकेकर यांचे आर्थिक व नैतिक पाठबळ लाभले.या सहलीच्या नियोजन व आयोजनासाठी , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंगदराव सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ.आशोकराव पाटील , आहरण व संवितरण अधिकारी डॉ.अनंद दापकेकर व समस्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले . ही शैक्षणिक सहल निर्विघ्न होण्यासाठी महाविद्यालयाचे सहल प्रमुख डॉ.शिवशंकर वानोळे, डॉ. दिपक पानपट्टे, डॉ. शिवाजी माने, डॉ.सागर खटके, प्रा. स्नेहा मुन व कनिष्ठ सहाय्यक भाग्यश्री निडवंचे यानी अथक परिश्रम घेतले.

# श्यामलाल हायस्कूलमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक संवाद बैठक संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्यामलाल मेमोरीयल हायस्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ २०२५ मध्ये १० वी च्या वर्गातील विद्यार्थीमत्यांचे पालक व शिक्षक यांची संवाद बैठक संपन्न झाली.

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुपोषपाणि आर्य यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भुषवून कार्यक्रमाची शोभा वाढवली तर प्रमुख उपस्थिती म्हणून श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेच्या सहसचिव श्रीमती अंजुमणी आर्य उपस्थित होत्या.पालक प्रतिनिधी म्हणून बजरंग शिवशेट्टे, गट साधन केंद्र उदगीर चे विषय तज्ञ धनाजी जाधव , महिला पालक प्रतिनिधी दासरवाड ताई , शाळेचे मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, पर्यवेक्षक राहुल लिमये, प्राध्यापक भारत खंदारे, जेष्ठ शिक्षक संजय देबडवार इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

विद्यार्थी -पालक- शिक्षक संवाद बैठकीमध्ये संस्थाध्यक्ष ॲड. सुपोषपाणि आर्य यांनी विद्यार्थी व पालकांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले. पालकांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे., आपल्या पाल्यांच्या क्षमता काय आहेत, त्याला कोणत्या विषयांमध्ये अडचणी निर्माण होतात आणि त्या सोडवण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, तणावरहित वातावरणात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती कशी होईल याकडे शिक्षक आणि पालक यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षार्थी न होता ज्ञानार्थी होणे ही काळाची गरज आहे, भविष्यात जे काही आपण होणार आहोत त्यासाठी अगदी प्रामाणिकपणे अभ्यास व कार्य करावे यासंबंधी मार्गदर्शन केले.

पालक प्रतिनिधी बजरंग शिवशेट्टे, गट साधन केंद्र उदगीर विषय तज्ञ धनाजी जाधव यांनीही या संवाद बैठकीमध्ये आपले मनोगत व्यक्त केले.

जेष्ठ शिक्षक संजय देबडवार तसेच गणित विषय शिक्षक सतिष बिरादार यांनी विद्यार्थी व पालक यांना विद्यार्थ्यांची शालेय शिस्त, नियमित उपस्थिती, दिलेल्या अभ्यासाचा सराव, स्वय अध्ययन , आरोग्यदायी सवयी, पोषक आहार यासंबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन व्ही कांबळे यांनी केले तर आभार व्यक्त करण्याचे कार्य उमाकांत सूर्यवंशी यांनी केले.

# सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम साबणे यांचा अमृत महोत्सव साजरा



उदगीर येथील सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम रामचंद्र साबणे यांच्या ७५ व्या वाढदिवस अमृत महोत्सव निमित्त राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री यांच्या हस्ते सत्कार करुन साजरा करण्यात आला. यावेळी जि.प.चे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटील, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक विश्वनाथ मुडपे, रमाकांत बनशेळकीकर, प्राचार्या सौ. मैनाताई साबणे, प्राचार्य जयमाला खटके, प्राचार्य सचिन साबणे, डॉ. विश्वजीत खटके, डॉ. सुष्मा साबणे, डॉ. सुनिल मदने, डॉ. रावसाहेब थोरात, माजी सहाय्यक आयुक्त प्रा.सुरेखा पालिमकर, प्रा. कृष्णा पालिमकर, डॉ. आनंद साबणे, ॲड. देविदास साबणे, विकी थोरात, व्यंकट साबणे, मोतीलाल साबणे, गोविंद साबणे, सेवानिवृत्त शिक्षक पी.जी. पाटील, कोयले, कृष्णकांत पत्की यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहुन तुकाराम साबणे यांना अमृत महोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात फाउंडेशन कोर्स सुरू

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर :येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात ४ एप्रिल २०२४ पासून फाउंडेशन कोर्स सुरू होत आहे .या कोर्समध्ये दहावीची परीक्षा दिलेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. या फाउंडेशन कोर्समध्ये NEET/JEE/MHT-CET वर्गाची तयारी करून घेतली जाणार आहे .अधिक माहितीसाठी महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ.आर. के. मस्के, उपप्राचार्य एस.जी. कोडचे यांनी केले आहे.

# लोकमान्य अर्बन को ऑप सोसायटीचा वर्धापन दिनानिमित्त माउली ग्रुपच्या वतीने सत्कार

**उदगीर (प्रतिनिधी)** लोकमान्य अर्बन क्रेडीट को ऑप सोसायटी लि. चा प्रथम वर्धापन दिन संपन्न झाला यावेळी उदगीर शहरातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, वाणिज्य क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देवून शुभेच्छा दिल्या. उदगीर येथील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या माउली ग्रुपच्या वतीने क्रेडीट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष कुमार चौधरी, उपाध्यक्ष माजी उपप्राचार्य सुभाष बडीहवेली, सचिव अनिल मुदाळे यांना शुभेच्छा दिल्या.



यावेळी माउली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत जोईजोडे, उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, सहसचिव सुनिल पाटील, विलास बोके, मुख्याध्यापक शिवशंकर जिवने, राम मोतीपवळे, ॲड. कपील बिरादार, शिवशंकर मठपती, संजय दुनगे, शिवलिंग मठपती, विजयकुमार सजनशेट्टे, डॉ. विजय कवठाळे, मन्मथ मुळे, शिवाजी चिल्ले, विजय कळसे, संतोष काळेकर, भरत कोयले आदिंनी शुभेच्छा दिल्या.